# मेहता मराठी ग्रंथजगत

ऑगस्ट, २०२६
पृष्ठे ६८ किंमत : रु.१५
वर्ष सव्विसावे
अंक आठवा



## साहित्य पुरस्कारासाठी आवाहन



# ‘प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार’



‘मेहता पब्लिशिंग हाऊस’चे संचालक श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सन २०२४ पासून **‘प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार’** देण्यास सुरुवात झाली. या पुरस्काराची घोषणा १० जानेवारी, २०२३ रोजी डॉ. किरण बेदी यांच्या उपस्थितीत करण्यात आली होती. या पुरस्काराचे स्वरूप खालीलप्रमाणे असून साहित्य क्षेत्रात प्रथम प्रकाशनास प्रोत्साहनपर हा पुरस्कार दिला जाणार आहे.

**सर्वोत्कृष्ट कादंबरी**
**₹ ३०,०००/-**

**सर्वोत्कृष्ट कथासंग्रह**
**₹ २०,०००/-**

### पुरस्कारासाठी अर्ज करण्यासंदर्भात प्राथमिक नियम व अटी :

१ ऑक्टोबर, २०२५ ते ३० सप्टेंबर, २०२६ दरम्यान प्रकाशित झालेली लेखकाची पहिली कादंबरी किंवा कथासंग्रह या पुरस्कारासाठी ग्राह्य धरली जाईल.

अर्ज स्वीकृतीची अंतिम तारीख : १ नोव्हेंबर, २०२६पर्यंत

पात्र इच्छुकांनी पुस्तकाची एक प्रत, संपूर्ण परिचय, संपूर्ण माहिती (नाव, पत्ता, संपर्क क्रमांक) आणि फोटो आमच्या पत्त्यावर पाठवावे.

या पुरस्काराची घोषणा डिसेंबर, २०२६मध्ये केली जाईल.
१२ जानेवारी, २०२७ रोजी श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिदिनी पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे.

# मेहता मराठी ग्रंथजगत

♦ ऑगस्ट २०२६ ♦ वर्ष सव्विसावे ♦ अंक आठवा

**संपादक**
अखिल मेहता

**संस्थापक संपादक**
शंकर सारडा

**संपादन साहाय्य**
अंजली पटवर्धन

**अंकाची किंमत १५ रु.**
वर्गणी मनीऑर्डरने अथवा
ऑनलाइन पाठवावी.

**प्रसिद्धी :**
दरमहा ११ तारखेस

**मांडणी-अक्षरजुळणी**
मेहता पब्लिशिंग हाउस

## – अनुक्रमणिका –


| | |
|---|---|
| संपादकीय | ४ |
| पुरस्कार | १० |
| श्रद्धांजली | ११ |
| विशेष लेख | १२ |
| भावस्मरण | २६ |
| **पुस्तकाच्या पानांतून** | |
| जहांगीर | ३६ |
| यूज ऑफ फोर्स | ४२ |
| रुक्की | ५६ |
| दिनविशेष | ६२ |


संपादक-मुद्रक-प्रकाशक : अखिल मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, पुणे ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२ । E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक अखिल सुनील मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून, १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - अखिल सुनील मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Akhil Sunil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Akhil Sunil Mehta.



# संपादकीय

## नमन शब्दगंधर्वांना..!

मराठी साहित्यातील दोन दिग्गज साहित्यिक- मराठीतील प्रथम ‘ज्ञानपीठ विजेते जीवनवादी लेखक’ वि. स. खांडेकर आणि ग्रामीण साहित्याचे प्रणेते ‘व्यंकटेश माडगूळकर’ यांच्या साहित्यिक आठवणींना उजाळा देत करू या नमन शब्दगंधर्वांना..!

हे वर्ष ‘वि. स. खांडेकर’ यांचं सुवर्ण स्मृतिवर्ष आणि ‘व्यंकटेश माडगूळकर’ यांचं जन्मशताब्दी वर्ष आहे. १८९८–१९७६ हा वि. स. खांडेकर यांचा आणि १९२७– २००१ हा व्यंकटेश माडगूळकर यांचा काळ बघता दोन्हीही काळ काहीअंशी एकमेकांत गुंफलेले दिसून येतात.

आगरकरी विचारांचा पगडा असलेले खांडेकर हे ‘जीवनवादी’ आणि ‘ध्येयवादी’ होते. जीवनासाठी कला, मानवी मूल्यं, लोककल्याण आणि माणुसकी यातूनच त्यांची लेखनशैली वाचकाला समृद्ध करत गेली. त्यांची



भाषा अत्यंत लालित्यपूर्ण, रम्य कल्पनांनी युक्त आणि वाचकांना अंतर्मुख करणारी आहे.

आज, शतकांनंतरही खांडेकरांचे शब्द बकुळगंधाप्रमाणे मेहता पब्लिशिंग हाऊसचं दालन सुवासित करतात तेव्हा संपूर्ण दालन मोहरून जातं. 'कादंबरी', 'कथासंग्रह', 'रूपककथासंग्रह', 'कुमारवाङ्मय', 'लघुनिबंधसंग्रह', 'व्यक्तिचित्रे', 'पत्रे', 'आत्मचरित्र' यांसारख्या असंख्य साहित्यप्रकारांत खांडेकरांची लेखणी शब्दांची पेरणी करत होती. त्यामुळे त्यांच्या साहित्याबद्दल 'अजून येतो वास फुलांना' असंच म्हणावं लागेल. 'ययाति' या त्यांच्या कादंबरीसाठी त्यांना १९७४चा प्रतिष्ठित 'ज्ञानपीठ पुरस्कार' मिळाला. त्याचबरोबर 'अमृतवेल', 'वन्हि तो चेतवावा!', 'फुले आणि दगड', 'चंदेरी स्वप्ने', 'घरटे', 'सोनेरी सावल्या', 'मंजिऱ्या' आणि 'केशवसुत : काव्य आणि कला' इत्यादी त्यांचं साहित्य बदलत्या काळातही अत्यंत लोकप्रिय ठरत आहे.

त्याचबरोबर अजून एक गोष्ट नमूद करावीशी वाटते की, खांडेकरांचे अप्रकाशित आणि असंकलित साहित्य प्रकाशित करण्याचा ध्यास डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी घेतला आहे. संकलक, संशोधक व संपादक म्हणून डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी केलेलं हे काम त्यांची खांडेकरांप्रति असलेली श्रद्धा आणि साहित्याप्रति असेलेली आस्था अधोरेखित करते. मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे खांडेकरांच्या या सुवर्ण स्मृतिवर्षात डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी संकलित केलेलं 'आगरकर चरित्र', 'वृंदावन (अपूर्ण कादंबरी)', 'अर्घ्यदान', 'सृतींची चाळता पाने' यांसारखं साहित्य येत्या काही काळात प्रकाशित होत आहे. सांस्कृतिक विश्वामध्ये डॉ. सुनीलकुमार लवटे यांच्याकडून हे महत्त्वाचे कार्य होत आहे आणि मेहता पब्लिशिंग हाऊस ते प्रकाशित करत आहे याचा आनंद तो काय वर्णावा!

'व्यंकटेश माडगूळकर' यांचेही मराठी साहित्यातील योगदान अमूल्य आहे. काळ बदलला तरी त्यांची लेखनशैली वाचकांच्या मनावर आजही गारूड घालते. माडगूळकर हे मराठीतील श्रेष्ठ कादंबरीकार, कथाकार, पटकथाकार आणि चित्रकार. त्यांची लेखनशैली ही मातीशी नाळ जोडलेल्या जीवनाच्या अस्सल गाभ्यालाच स्पर्श करणारी आहे. गाव आणि जंगल यांच्यामध्ये रमतानाच मुक्या प्राण्यांच्या जीवनाला व अबोल भावनेलाही

ते तितक्याच सहजपणे हात घालतात. त्यांची ही शब्दांची किमया, त्यांचं हे अफाट ज्ञान साहित्यरूपातून वाचताना पदोपदी जाणवतं. अंधारातून पहाट व्हावी किंवा कळीचं फूल व्हावं इतक्या सहजतेनं रेखाटलेली त्यांची रेखाटनंही बोलकी आहेत असा भास ती बघताना होतो.

साहित्यशैली आणि चित्र यांचा मेळ वाचकाला पुस्तकाच्या विश्वात मृद्गंधाप्रमाणे घेऊन जातो आणि न विसरता येणारी आठवण देऊन जातो. 'कथा', 'कादंबरी', 'रूपांतरित कथासंग्रह', 'आत्मचरित्र', 'व्यक्तिचित्रण', 'प्रवासवर्णन' इत्यादी साहित्य प्रकारांतून व्यक्त होणारी माडगूळकर-शैली वाचकांना आकर्षित करते. माडगूळकर कोणत्याही कल्पनारम्यतेशिवाय, अगदी साध्या आणि ओघवत्या भाषेत लिहीत जातात. 'बनगरवाडी' आणि 'माणदेशी माणसं' या त्यांच्या अजरामर कलाकृतींबरोबर; 'वावटळ', 'कोवळे दिवस', 'गावकडच्या गोष्टी' इत्यादी कादंबऱ्या; 'हस्ताचा पाऊस', 'चित्रकथी', 'उंबरठा' इत्यादी कथासंग्रह आपल्या दृष्टीस न पडलेल्या जगाची जाणीव करून देतात. तसेच 'जीवनातली रेखाटनं' यासारखं स्केचेसमधून उभ्या केलेल्या व्यक्तिरेखांचं अनोखं पुस्तकही वाचकांना खूप भावतं. मेहता पब्लिशिंग हाऊसच्या दालनात माडगूळकरांच्या साहित्याचा मृद्गंध गेली चारहून अधिक दशकं नित्यनेमानं दरवळत आहे. वर्षाॠतू असो अथवा नसो, हा गंध वाचकांमध्येही दरवळल्यावाचून राहत नाही. शान्ताबाई म्हणतात तसं,

*शब्दांचा खरा आशय कळण्यासाठी*
*अर्धे जगणे जगूनही पुरे पडत नाही (गोंदण, पान नं ३३)*

खरंच, 'वि. स. खांडेकर' आणि 'व्यंकटेश माडगूळकर' यांच्या साहित्याचा वाचकांवरील परिणाम असाच काहीसा आहे. या ओळींचा अर्थ जरी माणसांशी निगडित असला तरी माणसांनीच लिहिलेल्या साहित्यातही तो तितकाच समरस होऊन जातो. एखादं पुस्तक एकदा वाचून संपूर्ण कळतं असं होत नाही. वयाच्या निरनिराळ्या टप्प्यांवर किंवा वेगवेगळ्या परिस्थितीत एखादं पुस्तक किंवा एखादं कथानक नव्या अर्थासह प्रत्येक वेळेस समोर येतं. मग 'हे आधी का उलगडलं नाही' हे नकळत मनात येतं आणि इथेच खऱ्या अर्थानं जगणं अपुरं पडतं हे जाणवतं. खांडेकर आणि माडगूळकर हे फक्त साहित्यिक नव्हते; तर मानवाच्या हृदयात शिरून त्याचा

जगण्याकडे बघण्याचा दृष्टिकोन कसा बदलायचा याचा अभ्यास करणारे गाढे अभ्यासकही होते. आजच्या घडीला या दोघांच्याही साहित्याचा वाचकांवरचा पगडा कमी झालेला नाही असं दिसून येतं.

खांडेकर आणि माडगूळकर यांना स्मृतिपुष्प अर्पण करताना प्रख्यात कवी 'बा. भ. बोरकर' यांच्या दोन ओळी आवर्जून आठवतात, त्या अशा की,

*मीपण ज्यांचे पक्व फळापरी*
*सहजपणाने गळले हो*
*जीवन त्यांना कळले हो...*

**'वि. स. खांडेकर' आणि 'व्यंकटेश माडगूळकर' यांच्या स्मृतींस विनम्र अभिवादन!**

अखिल मेहता

# चाहूल दिवाळी अंकाची!

**ते आहे...**

पुस्तकाचं अंतरंग उलगडणारं...
विविध रंगांतून बोलणारं... भाववैविध्य टिपणारं...

**पण,**

खरंच ते घडतं कसं..? खरंच बोलतं कसं..?
खरंच वाचकांना भावतं कसं..?

**त्याला म्हणतात तरी काय..?**

उत्तर :-

## 'मुखपृष्ठ'

या विषयाला विविध अंगांनी भिडण्याचा, त्याची निर्मितिप्रक्रिया जाणून घेण्याबरोबरच त्याचं बहुरंगी सौंदर्य उलगडण्याचा एक अनोखा प्रयत्न...
तर वाचक हो, सज्ज व्हा...
दिवाळी अंकातून या विषयाचे कंगोरे टिपण्यासाठी!!

# मेहता मराठी ग्रंथजगत

**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी**
**आजच वर्गणीदार व्हा**

आमच्या छापील अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ४५० रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ६०० रुपये**

डिजिटल अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ३०० रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ४०० रुपये**

*Available on*

amazonkindle | Google Play Books

अधिक माहिती जाणून घेण्यासाठी
आम्हाला फॉलो करत रहा!

**http://www.facebook.com/mehtapublishinghouse**



टी बुक क्लब
मेहता पब्लिशिंग हाऊस
टी बुक क्लब योजनेतील ‘क्लासिक्स’साठी खास सवलत!
₹ १०० भरून ‘टी बुक क्लब’ यादीतील कोणतीही ८ किंवा सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा.
पोस्टेज खर्च अतिरिक्त
BOOK CLUB
या क्लबचे सभासद व्हा. आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके निम्म्या किमतीत मिळवा!
आजच व्हा सदस्य, निम्म्या किंमतीत मिळवा पुस्तकं
* ₹ ५० भरून ‘टी बुक क्लब’चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक
‘टी बुक क्लब’ ची ग्रंथसूचि पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा
फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५
सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक -
www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx




नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks
युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर
– थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड, किंडल आणि ॲन्ड्रॉइड टॅब्लेटवर!
॥ स्वामी ॥
रणजित देसाई
ebook available on :
Google Play Books
amazonkindle
Get it on Apple Books

# पुरस्कार

## डॉ. सुनीलकुमार लवटे यांना प्राचार्य शिवाजीराव भोसले स्मृतिसन्मान

**पुणे :** प्रा. शिवाजीराव भोसले यांच्या जन्मशताब्दीनिमित्त प्राचार्य शिवाजीराव भोसले स्मृती समितीतर्फे विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं. या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ समीक्षक डॉ. सुनीलकुमार लवटे यांना महाराष्ट्र ज्ञान महामंडळाचे प्रमुख सल्लागार डॉ. विवेक सावंत यांच्या हस्ते 'प्राचार्य शिवाजीराव भोसले - स्मृतिसन्मान' प्रदान करण्यात आला. या सोहळ्याला प्रा. मिलिंद जोशी, गदिमा प्रतिष्ठानचे विश्वस्त आनंद माडगूळकर उपस्थित होते.

डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी थोर साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्या साहित्याचं संपादन केलं असून त्यावरची 'कल्पनातरंग', 'समुद्रमंथन', 'साहित्यप्रतिभा : सामर्थ्य आणि मर्यादा', 'प्रज्ञा आणि प्रतिभा' अशी अनेक पुस्तकं मेहता पब्लिशिंग हाऊसनं प्रकाशित केली आहेत. तसेच 'भारतीय साहित्यिक', 'खाली जमीन वर आकाश', 'स्वप्न आणि सत्य' अशी विविध विषयांवरची पुस्तकंदेखील मेहता पब्लिशिंग हाऊसच्या दालनात वाचकांसाठी उपलब्ध आहेत.

वि. स. खांडेकरांच्या साहित्यानं प्रभावित झालेल्या डॉ. सुनीलकुमार लवटे यांचं मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे हार्दिक अभिनंदन!

◆

# श्रद्धांजली

## रंगभूमीवरील युगान्त!

**मुंबई :** मराठी रंगभूमीच्या वाटचालीत मोलाचं योगदान देणाऱ्या ज्येष्ठ दिग्दर्शिका विजया मेहता यांचं जाणं म्हणजे रंगभूमीवरील एक युगान्त! मराठी रंगभूमीवरील प्रायोगिक चळवळीची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या रंगकर्मींमध्ये विजया मेहतांचादेखील सहभाग होता. नाट्यविश्वात ज्यांना आदरानं 'बाई' असं संबोधलं जायचं, त्या विजयाबाईंनी १९६० साली डॉ. श्रीराम लागू, अरविंद देशपांडे आणि विजय तेंडुलकर यांच्यासमवेत 'रंगायन' नाट्यसंस्था सुरू केली. या संस्थेसाठी विजयाबाईंनी दिग्दर्शित केलेली अनेक नाटकं गाजली. दिग्दर्शनाबरोबरच त्यांचा अभिनयदेखील दर्जेदार होता.

त्यांनी 'मदर आई', 'मादी', 'एक शून्य बाजीराव' 'शितू' ही रंगायनतर्फे केलेली प्रायोगिक नाटकं लोकप्रिय झाली. शिवाय 'हमीदाबाईची कोठी', 'वाडा चिरेबंदी', 'पुरुष', 'सावित्री' अशी व्यावसायिक नाटकंदेखील गाजली. यासोबत विजयाबाईंनी जर्मन रंगभूमीसाठी 'फ्रिट्झ बेनेव्हिट्झ' यांच्यासमवेत 'शाकुंतल', 'मुद्राराक्षस', 'हयवदन', 'नागमंडल' ही नाटकं दिग्दर्शित केली.

मराठी रंगभूमीला प्रायोगिकतेतून समृद्ध करणाऱ्या आणि रसिकांना सातत्यानं नवीन नाट्यानुभव देणाऱ्या 'विजया मेहता' यांना मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली!

◆

## विशेष लेख

### वि.स. खांडेकरांच्या हृदयसंवादी प्रस्तावना

प्रस्तावना शब्दाचा मूळ अर्थ प्रारंभ होय. इंग्रजीत त्याला Preface, Introduction, Foreword, Prologue सारखे शब्द वापरण्याचा प्रघात दिसून येतो. मराठीत त्या अंगाने भूमिका, पार्श्वभूमी, मनोगत, प्रशस्ती, पुरस्कारासारखे शब्द वापरले जातात. प्रस्तावनालेखक आपल्या निवेदनातून ग्रंथनिर्मितीमागील कल्पना, उद्देश, लेखनप्रक्रिया इत्यादीबद्दलचं आपलं मत व्यक्त करत असतो. वाचकांची मनोभूमिका तयार करण्याचं कार्य प्रस्तावना लेखनातून होत असतं.

अशा प्रस्तावना औपचारिक, अनौपचारिक, संक्षिप्त, दीर्घ असतात. त्या ग्रंथविषयाची पूर्वपीठिका तयार करण्याचं कार्य करतात. संगीत नाटकामध्ये नांदीचं जे कार्य नि महत्त्व असतं, ते ग्रंथांच्या बाबतीत प्रस्तावनेचं असतं. लेखकानं वा तज्ज्ञ व्यक्तीनं वाचकांच्या सोयीसाठी ग्रंथाचं अंतरंग उलगडून दाखवण्याच्या उद्देशानं केलेली प्रशंसा वा विश्लेषण असं प्रस्तावनेचं सर्वसाधारण स्वरूप असतं. चित्रपटाचा 'ट्रेलर' वा 'टिझर' जसा असतो, प्रस्तावना थोडीफार तशीच असते. एका अर्थानं प्रस्तावना ग्रंथसार वा सारांश असते असं म्हटलं तरी चालेल. यात कधीकधी

मूल्यांकनही होत असतं.

प्राचीन वा मध्ययुगीन काळात मराठी ग्रंथांना, काव्य कृतींना प्रस्तावना नसत. प्रारंभिक मंगलाचरण, ओवी , अभंग हाच त्या रचनेचा प्रारंभ असे. ईश्वरप्रसाद, कृपा म्हणून आपलं हे लेखन झाल्याचा कृतज्ञभाव यामागे असायचा. हा काळ हस्तलिखितांचा होता. आधुनिक काळात मुद्रण आलं. पाश्चात्त्य ग्रंथांचा संपर्क आला, तशा ग्रंथांना प्रस्तावना सुरू झाल्या. बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग तर्खडकरांच्या ग्रंथांना अशा प्रस्तावना लिहिल्या गेल्याचं दिसतं. एकोणिसाव्या शतकात प्रस्तावना लेखनानं मूळ धरलं. विसाव्या शतकात तिचा विस्तार झाला. वर्तमान शतकात तिचं स्वरूप परिचयाकडून विश्लेषण, मूल्यमापन, संशोधनकेंद्री होताना दिसून येतं. वि. स. खांडेकरांनी ग्रंथलेखक म्हणून 'संगीत रंकाचे राज्य' या नाटकाने सन १९२८ साली मराठी साहित्यात पदार्पण केले. या नाटकास लिहिलेली 'प्रस्तावना' ('राज्या'चा इतिहास) हीच खांडेकरांची पहिली प्रस्तावना होय. सन १९७६पर्यंत खांडेकरांचे ग्रंथ प्रकाशित होत राहिले. या सुमारे पाच दशकांच्या कालखंडात त्यांनी स्वतःच्या नि इतरेजनांच्या ग्रंथांना लिहिलेल्या प्रस्तावनांचा विचार करता, ही संख्या दोनशेच्या घरात जाते. इतक्या विपुल प्रमाणात प्रस्तावना लिहिणारे खांडेकर त्यांच्या समकालातील अपवादात्मक लेखक ठरावेत. त्यांचे समांतर प्रतिस्पर्धी प्रस्तावनाकार म्हणजे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी होत.

साहित्यिक म्हणून वि. स. खांडेकर बहुप्रसव होते. त्यांचं साहित्य विविध प्रकारांनी बहरत राहिलं. कथा, कविता, कादंबरी, लघुनिबंध, भाषण, मुलाखती, समीक्षा, पत्रलेखन भाषांतर, पुस्तक परीक्षणं, स्फुटलेखन, संपादन, वैचारिक, विनोदी, व्यक्तिलेख, पटकथा, आत्मकथा असं ते विविधांगी होतं. या सर्व प्रकारच्या स्वग्रंथांना खांडेकरांनी छोट्या-मोठ्या प्रस्तावना लिहून आपल्या ग्रंथ- लेखनामागील भूमिका विशद करण्याचा प्रघात ठेवला. प्रदीर्घ म्हणता येतील अशा प्रस्तावना 'ययाति'(कादंबरी), 'केशवसुत : काव्य आणि कला'(संपादन), 'अभिषेक'(भाषणसंग्रह), 'समाजचिंतन'(निबंधसंपादन) इ. आपल्या ग्रंथांना लिहिल्या आहेत. या मुळातून वाचत असताना प्रस्तावना लिहिताना खांडेकर किती गंभीर असत, याची प्रचीती येते. स्वग्रंथांना खांडेकर जितक्या उत्साहानं प्रस्तावना लिहीत, तितक्याच उत्साहानं; परंतु पूर्ण गांभीर्य व जबाबदारीनं ते इतरांच्या ग्रंथांना प्रस्तावना लिहीत. यातही कथासंग्रह,

काव्यसंग्रह, कादंबरी, निबंधसंग्रह, नाटक, चरित्र, समीक्षा असे वैविध्यपूर्ण ग्रंथ दिसून येतात. अशांपैकी कुसुमाग्रजांचा 'विशाखा'(काव्यसंग्रह), बाबा आमटेंचा 'ज्वाला आणि फुले (काव्यसंग्रह), 'ध्वनिकथा'- प्रा. प्र. ना. कवठेकर (प्रबंध), 'निवडक कोल्हटकर'(संपादन), 'रूपकम' (नाट्यखंड), 'नवे किरण' आणि 'पांढरी शिडे' (निबंधसंग्रह) - अनंत काणेकर, 'कथा सृजनाची' प्रभाकर अत्रे (समीक्षा) या ग्रंथांना लिहिलेल्या प्रस्तावना मनोवेधक ठरल्या. कुसुमाग्रजांनी 'विचारधारा' या खांडेकरांच्या प्रस्तावनांचे संपादन करून निर्मिलेला ग्रंथ हा प्रस्तावनाकार खांडेकरांचा केलेला गौरवच होय.

वि. स. खांडेकरांनी लिहिलेल्या प्रस्तावनांची शीर्षके- 'अंतरपाट', 'हृदयाची ओळख', 'मध्यस्थी', 'अर्घ्यदान', 'चिंतन', 'दिग्दर्शन', अशी संक्षिप्त; परंतु समर्पक राहत आली आहेत. 'दोन शब्द', 'चार शब्द' शीर्षकांच्या प्रस्तावना कधीच दोन-चार शब्दांत खांडेकरांना आटोपता आल्या नाहीत. खांडेकरांची प्रस्तावना लेखनाची स्वतःची म्हणून एक रचनापद्धती दिसून येते. ते एकदम ग्रंथाविषयी सांगू लागले असं सहसा दिसत नाही. पार्श्वभूमी तयार करणं हा त्यांच्या प्रस्तावनांचा प्रारंभिक खटाटोप राहिला आहे, ज्या साहित्यप्रकाराच्या ग्रंथांना ते प्रस्तावना लिहीत त्या साहित्यप्रकाराचा पूर्वेतिहास ते सांगण्यास विसरत नसत. या प्रकारच्या अन्य साहित्यकृतींची साक्ष, निर्वाळा, तुलना खांडेकर लिखित प्रस्तावनांमध्ये आपसूक येत राहते. ते जसजसे प्रस्तावनाकेंद्री साहित्यकृतीकडे वळतात, तसतसे ते संवादी होत जातात. 'हे हृदयीचे ते हृदयी' असा आत्मिक नि आत्मीय संवाद हृदयस्पर्शी न झाला तरच आश्चर्य! स्व-साहित्यकृतींना लिहिलेल्या प्रस्तावना या भूमिका विशद करणाऱ्या असतात; पण इतरेजनांच्या साहित्य रचनांना लिहिलेल्या प्रस्तावनांत खांडेकर प्रशंसक, प्रोत्साहक, आस्वादक, गुणग्राहक बनून समोर येतात. दोषदिग्दर्शन हे निरोपाच्या विड्यात मात्र उपचार म्हणून प्रतिबिंबित होते. प्रस्तावना सोदाहरण लिहिण्याचा प्रघात खांडेकर पाळतात. वि. स. खांडेकरांचं वाचन प्रारंभीपासूनच चतुरस्त्र राहत आल्याने प्रसिद्ध साहित्य रचनांचे उल्लेख करत वा दाखले देत ते चर्चित ग्रंथाचं अप्रत्यक्ष स्थाननिर्धारण करतात. ते इतिहास, काळ, वैशिष्ट्य अशा अनेक अंगांनी प्रसंगपूरक होत राहतं. यात वैश्विक स्थान- निर्धारण आपसूक येतं. खांडेकरांच्या प्रस्तावनांमधील उदारता, सकारात्मकता त्यांना स्वागतशील प्रस्तावनाकार सिद्ध करते. कुसुमाग्रज, बाबा

आमटे, बा. भ. बोरकर, केशवसुत यांच्या ग्रंथांच्या प्रस्तावना खांडेकरांनी इतक्या समरसून लिहिल्या आहेत की, त्या ललित, मनोहर शैलीचा ऐवज बनून जातात.

वि. स. खांडेकरांच्या काही प्रस्तावना औपचारिकपणे लिहिलेल्या आढळतात. अशांमध्ये कधीकधी पाल्हाळीकता, गोष्टीवेल्हाळपणा दिसून येतो. बऱ्याचदा विस्ताराच्या मोहात ते एकामागून एक उदाहरणे प्रस्तुत करत राहतात. वाचताना वाटत राहतं की, उगीच ते मारुतीची शेपूट लांबवत आहेत; पण तेच मनस्वी उतरलेल्या त्या प्रस्तावना कितीदा तरी वाचा, तुमचं समाधान करण्यात त्या अयशस्वी होतात. बाबा आमटेंच्या 'ज्वाला आणि फुले' या काव्यसंग्रहास लिहिलेली प्रस्तावना तर त्यांनी दोनदा लिहिली. या काव्यसंग्रहाच्या पहिल्या नि दुसऱ्या आवृत्तीस अनुक्रमे १९६४ व १९७१ साली दोन स्वतंत्र प्रस्तावना दोन स्वतंत्र शीर्षकाने लिहिल्या आहेत. बाबा आमटे यांच्या कवितांना खांडेकर 'समाजचिंतने' संबोधून त्यांचा गौरव करतात. पहिल्या प्रस्तावनेचे शीर्षकच मुळी इतके काव्यात्मक की वाचनाचा मोह अनिवार ओढ घेऊन येतो. 'लोकविलक्षण आत्म्याचे ऊर्जस्वल शब्दविलसित' हे शीर्षक बाबा आमटेंच्या कवितेचं प्रतिबिंब नि प्रतिरूप घेऊन येतं. त्यांच्या काव्याइतकी खांडेकरांची प्रस्तावना अनुभव नि चिंतनाचा ललितरम्य आविष्कार बनवते. 'ज्या करुणेचे रूपांतर कृतीत होत नाही, ती वांझ असते', 'पशू-पक्ष्यांप्रमाणे माणसालाही भूक असते... माणसाला शारीरिक भुकेबरोबर भावनिक आणि बौद्धिक भूकही असते' अशी सुभाषितं प्रस्तावनाभर झरत-पाझरत राहणं हे प्रस्तावनाकार नि कवी यांच्या एकात्म आविष्काराचं संयुक्तरूप बनणं हा खांडेकर, आमटे झाल्याचा पुरावा असतो.

वि. स. खांडेकर पदरमोड करून कुसुमाग्रजांचा पहिला काव्यसंग्रह 'विशाखा' प्रकाशित करतात. त्यास अशीच भावविकल प्रस्तावना लिहितात. त्यात ते म्हणतात, ''आजच्या साहित्य-क्षितिजावरील एक तेजस्वी तारा यादृष्टीने त्यांच्याकडे अनेक रसिक पाहत आले आहेत, यात तिळमात्र शंका नाही. प्रतिभासंपन्न कवीपासून कर्तबगार देशसेवकांपर्यंत विविध मनोवृत्तीच्या लोकांना त्यांच्या कवितेने मोहिनी घातली आहे. वाचनालयाच्या भिंतीपासून तुरुंगाच्या भिंतीपर्यंत कितीतरी ठिकाणी त्यांच्या वाणीचे पडसाद उमटले आहेत.''

''वि. स. खांडेकर ज्या वाङ्मय प्रकारविषयक लेखनाला आवर्जून

प्रस्तावना लिहितात त्याच्याशी त्यांचा पुरापुरा अनुबंध असतो. ‘पुरेपूर अनुबंधाने प्रदेश उजळून जाणे’ हा त्यातील महत्त्वाचा भाग असतो.’’ अशी प्रशंसा डॉ एस. एस. भोसले यांनी खांडेकरांच्या प्रस्तावनांवर लिहिताना केलेली आहे. ती प्रत्याक्षापेक्षा प्रत्यंकर म्हणायला हवी. विनोदी कथाकार चिं. वि जोशी यांच्या ‘गुदगुल्या’ कथासंग्रहास खांडेकरांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना आहे. त्यात ते चिं. वि. जोशींशी आपला परिचय कसा झाला, मराठीत विनोद कसा उदयाला आला, गडकरी, अत्रे यांच्या विनोदात काय फरक आहे, मार्क ट्वेन, जेरोम के. जेरोम, मोलियर या विश्वविख्यात विनोदी कथाकारांच्या कथांमध्ये Sense of Humour कसा असतो, संस्कृत भाषेतून मराठी भाषेत विनोद कसा पाझरला, मराठी नाटकांत विनोद कसा आहे, हा अनुबंध विस्ताराने सांगत खांडेकर लिहितात, ‘कोल्हटकर - गडकऱ्यांच्या विनोदापेक्षा चिंतामणरावांचा विनोद वेगळा. सर्वसामान्य दैनंदिन जीवनात आढळणाऱ्या लहानसहान विसंगतीवरच ते आपल्या विनोदाची उभारणी करतात. त्यांच्या भाषेत घरगुतीपणाही अधिक आहे. विनोदाच्या बाह्य शृंगारात ते विशेष कुशल नसले तरी त्यांच्या आत्म्याच्या विकासाकडे त्यांचे नेहमीच अवधान असते. त्यामुळे यांच्या लेखात मार्मिकपणाबरोबरच समतोलपणाही आढळतो. श्रेष्ठ विनोदाला आवश्यक असलेली सहृदयता त्यांच्या ठिकाणी नेहमी जागृत असलेली दिसते. वाचकाला गुदगुल्या करण्याकरिता ते पात्रांच्या मूर्खपणाला चिमटे घेत असले, तरी या चिमट्यांचे स्वरूप बहुधा तीव्र असत नाही. त्यांच्या लेखात मार्मिकपणा असूनही मर्मभेदकपणा येत नाही.’ ही सारी खांडेकरीय निरीक्षणं विनोदाच्या त्यांच्या व्यासंगाची साक्ष देत राहतात. मराठीतील फार थोड्या वाचक, अभ्यासकांना हे माहीत असावं की, खांडेकरांनी आपल्या प्रारंभीच्या काळात कोल्हटकर, गडकरी यांच्या लेखनशैलीचं त्यांच्यावर असलेल्या गडद गारुडाचा भाग म्हणून कोटिबाज शैली आत्मसात केली होती. ‘गाढवाची गीता’ आणि ‘गाजराची पुंगी’ हे खांडेकरांचे विनोदी लेखन किती जणांना माहीत आहे, किती जणांनी ते वाचले, अभ्यासले आहे?

वि. स. खांडेकरांच्या प्रस्तावनांमध्ये जीवनाचं तत्त्वज्ञान, भाष्य शिगोशिग भरलेलं असतं. ‘ययाति’ कादंबरीची प्रस्तावना त्याचा आरसा म्हणून दाखवता येते. एक कादंबरी विसाव्या शतकाच्या साठोत्तर कालखंडापूर्वी तत्त्वज्ञानावर उभी करणे, तेही मराठी कादंबरी आपल्या रंजकतेच्या चरमसीमेवर उभी असताना

लिहिणे हे केवळ खांडेकरच करू जाणे. तत्कालीन कलावादी लेखक, समीक्षक खांडेकरांना 'ध्येयवादी', 'स्वप्नाळू', 'पाल्हाळीक', 'आदर्शवादी' म्हणून हिणवत असताना त्यांच्या 'ययाति'सच भारतीय भाषांतील सर्वश्रेष्ठ 'भारतीय ज्ञानपीठ पुरस्कारा'ने सन्मानित करावे यालाच काव्यात्मक न्याय म्हणतात ना? मराठीस लाभलेला हा पहिला ज्ञानपीठ पुरस्कार! या पुरस्काराच्या सन्मानपत्रात भारतीय ज्ञानपीठानं म्हटलं आहे की, *'' 'ययाति' उनकी उत्कृष्ठ रचना हैं। जिसमें कथा और काव्य, मनोविज्ञान और दर्शन (तत्त्वज्ञान) ताना-बाना बनकर समाये हैं। और जिसकी विषयवस्तु समकालीन भी है कालातीत भी है। भारतीय और सार्वभौमिक (युनिवर्सल) इसके मुख्य चरित्र जिवन्तता के प्रतीक है और उनके पुरातन प्रतिमानों में अगाध अर्थवत्ता अनुप्रणित करने में खाण्डेकर सफल हुए है। एक प्राचीन मिथक का आधुनिक वाग्भंगी (भाषिक चमत्कृती)द्वारा 'ययाति' में नवसर्जन करके उन्होंने एक चिरस्थायी (अमर्त्य) संदेश आज के मानव जगत को दिया है, जो एक श्रान्त-क्लान्त (थकलेले दु:खी) दानव की नाई (प्रमाणे) आत्मा का बहिष्कार किये हुए भौतिक में ग्रस्त है।''* (कंसातील शब्द स्पष्टीकरणार्थ दिले आहेत, ते मूळ सन्मानपत्रात नाहीत.)

'ययाति'च्या प्रस्तावनेत वि. स. खांडेकरांनी विशद केलं आहे की, 'ही कादंबरी ययातीची कामकथा आहे, देवयानीची संसारकथा आहे, शर्मिष्ठेची प्रेमकथा आहे आणि कचाची भक्तिगाथा आहे, हे लक्षात घेऊन वाचकांनी ती वाचली तर मला आनंद वाटेल. कलात्मक रंजन, भावनांचे आवाहन, सामाजिक शिकवण आणि सूक्ष्म किंवा विशाल जीवनदर्शन अशा अनेक चढत्या पातळ्यांवर चांगली कलाकृती एकाच वेळी विहार करू शकते. यातल्या कुठल्या पातळीवर स्पर्श करायला मी असमर्थ ठरलो आहे, ते रसिकच सांगू शकतील.'

वि. स. खांडेकरांच्या विश्लेषक प्रस्तावना म्हणजे त्यांनी लिहिलेले लघुप्रबंधच होत. पन्नास-साठ पृष्ठांच्या या प्रस्तावनांची वानगी अनुभवायची तर जिज्ञासूंनी 'केशवसुत : काव्य आणि कला'(१९५६) या आपल्या संपादित ग्रंथास लिहिलेली प्रस्तावना अनिवार्य होते. 'Must Read' असा हा नजराणा! यात प्रथमच केशवसुतांचं व्यक्तिगत जीवन नि व्यक्तिमत्त्व चित्रित केलं आहे. यातून केशवसुतांप्रति खांडेकरांच्या मनात असलेला अढळ आदरभाव लक्षात येतो. १२ एप्रिल, १९२० रोजी खांडेकरांनी शिरोडा इथे शिक्षक व्हायचं म्हणून

सावंतवाडीतील आपलं दत्तक घर नि नातं कायमचं गंगार्पण केलं, त्या दिवशी त्यांनी अंगावरच्या पैरण आणि धोतरासह गृहत्याग केला. हाती एक छोटी कापडी पिशवी होती. त्या पिशवीत एकच पुस्तक होतं. 'केशवसुतांची कविता' त्याचं नाव. या कवी नि काव्यानी अनाथ खांडेकरांना आजन्म सनाथ करून टाकलं. या ग्रंथाच्या दीर्घ प्रस्तावनेत खांडेकरांनी नमूद केलं आहे की, 'केशवसुतांच्या कवितेइतकी दुसऱ्या कुणाच्याच कवितेने आयुष्यभर माझी सोबत केलेली नाही. आजही (१९५६) एखाद्या बालमैत्रिणीसारखी मला ती वाटते. त्यांची कवने बकुळीच्या फुलासारखी आहेत. ती नाजूक वेलींवर उमलली नसतील, त्यांचे बहिरंग मोहक रंगाचे नसेल; पण प्रथम किंचित मंद भासणाऱ्या त्यांच्या सुगंधात अपूर्व सजीवता आणि उत्कटता आहे. इतर फुलांपेक्षा बकुळीच्या फुलांचा सुगंध दीर्घकाळ टिकतो. तोच गुण 'वातचक्र', 'सतारीचे बोल', 'झपूर्झा', 'हरपले श्रेय' इत्यादी कवितांत आहे.''

ज्यांना कुणाला आयुष्याच्या अडलेल्या वळणावर पुढे प्रवास करण्याची उमेद नि ऊर्जा हवी, ज्यांना जीवनाचे हरवलेले संदर्भ शोधून पुन्हा ते हाती यावे असे वाटते. अशांनी खांडेकरांच्या कुठल्याही प्रस्तावना वाचाव्यात, त्या त्यांना नवसंजीवनी दिल्याशिवाय राहणार नाहीत. खांडेकरांनी वा. म. जोशींच्या 'सुशीलेचा देव', साने गुरुजींच्या 'आस्तिक', मॅक्झिम गॉर्कीच्या विनायकराव भुस्कुटे भाषांतरित 'आई' कादंबऱ्यांना प्रस्तावना लिहिल्या आहेत. त्यातील काही संपादने आहेत. गॉर्कीच्या 'आई'च्या प्रस्तावनेत खांडेकर जीवनभाष्य करत म्हणतात, 'सामान्य मनुष्याचा खरा शत्रू निसर्ग नाही, त्याचा कट्टर शत्रू त्याच्या रक्ताने पुष्ट होणारा, त्याच्या गुलामीवर आपले स्वातंत्र्य उभारणारा, त्याच्या मृत्यूने आपले जीवन वाढवून घेणारा, सत्ता व संपत्ती या साधनांमुळे असामान्य भासणारा आणि त्याचा मालक म्हणून मिरवणारा मनुष्य आहे. या दोन भिन्न मनुष्यांतले युद्ध आजच्या घटकेला अगदी अपरिहार्य आहे. या युद्धाचे स्वरूप देश, काल, परिस्थितीप्रमाणे पालटेल; पण हे युद्ध मानवजातीला लढावे लागेलच लागेल. ते लढताना गॉर्कीची 'आई' दलितांच्या सत्पक्षाला नेहमीच धीर देत राहील.' हे केवळ जीवनभाष्य नसून प्रेरक प्रेरणास्रोत होय.

मराठी साहित्यात कथा, कादंबऱ्यांपेक्षा अधिक महत्त्वाचे ठरते ते निबंधसाहित्य. कारण, त्यांचा 'आत्मा' हा विचार असतो. वि. स. खांडेकरांनी 'नवे किरण'(अनंत काणेकर), 'अग्निनृत्य'(शि. म. परांजपे),

‘मनाची मुशाफिरी’(म. ना. अदवंत) हे निबंधसंग्रह संपादित केले असून, त्यांना यथोचित प्रस्तावना जोडल्या आहेत. त्यापैकी शि. म. परांजपे यांचे निबंध उल्लेखनीय खरेच! ‘काळ’चे निबंध जितके परिणामकारक तितकेच ‘अग्निनृत्य’मधीलही त्यांची भलामण करत खांडेकर सांगतात की, ‘मुक्तेश्वर किंवा गडकरी यांच्यासारख्या कवीच्या पंक्तीतच शिवरामपंतांचे स्थान आहे. देशभक्तीखेरीज दुसऱ्या कुठल्याही भावनेचा उत्कट परिपोष त्यांच्या वाङ्मयात सहसा आढळत नाही, हे खरे. यादृष्टीने त्यांचे कविमन एककल्ली होते, असे म्हणता येईल; पण कल्पकतेची रम्य, रौद्र, भव्य, भीषण, करुण, उदात्त, अशी विविध स्वरूपे त्यांच्या निबंधांत इतक्या विपुलतेने आढळतात, की त्यांची श्रेष्ठ कवींच्या मालिकेत गणना न करणे केवळ अरसिकपणाचे ठरेल.’ हे उद्‌गार केवळ प्रशंसा म्हणून पाहून चालणार नाही, त्याकडे वस्तुनिष्ठ दृष्टीनेच बघणे श्रेयस्कर!

वि. वा. शिरवाडकर तथा कुसुमाग्रज यांनी सन १९९३मध्ये वि. स. खांडेकरांनी आपल्या कादंबऱ्या व कथासंग्रहांना ज्या प्रस्तावना लिहिल्या, त्यातील निवडक नऊ प्रस्तावनांचा एक संग्रह संपादित केला आहे. ‘विचारधारा’ शीर्षकाने प्रकाशित या प्रस्तावनासंग्रहास कुसुमाग्रजांची वेधक प्रस्तावना आहे. संग्रहित प्रस्तावनांचे वैशिष्ट्य असे की, मूळ प्रस्तावनेतील विचारगर्भ अंशच या संग्रहात आहे. खांडेकरांच्या प्रस्तावनांतील विचारधारा वा विचारवैभव अधोरेखित होण्यास मोठे साहाय्य लाभले आहे. एक कथासंग्रह (सांजवात) यात आहे. खांडेकरांच्या ज्या १८ कादंबऱ्या आजवर हाती आल्या, त्यापैकी ‘सुखाचा शोध’, ‘दोन ध्रुव’, ‘रिकामा देव्हारा’, ‘उल्का’, ‘पहिले प्रेम’ (दोन प्रस्तावना), ‘जळलेला मोहर’, ‘हिरवा चाफा’ आणि ‘ययाति’ अशा आठ श्रेष्ठ कादंबऱ्यांच्या या प्रस्तावनांचे वैचारिक सार यात संग्रहित आहे. यात शिरवाडकरांनी खांडेकराच्या चर्चित रचनांसंदर्भात आपली निरीक्षणे नोंदवली आहेत. ती निरीक्षणे दुसऱ्या अंगानी पाहू लागता, ती खांडेकरांच्या प्रस्तावनांची गुणवैशिष्ट्ये म्हणून आपल्या समोर येतात. म्हणजे असे की, ‘खांडेकरांच्या कादंबऱ्यांत विचारसूत्र गुंफलेले असते. त्यात जीवनविषयक विचार समजावण्याचा प्रयत्न असतो. खांडेकरांची लेखनशैली आलंकारिक आणि सुभाषितात्मक असते. खांडेकरांमुळे मराठी वाचकांवर समन्वयी समाजवादाचा प्रभाव पडला. समताधारित लोकशाहीचे खांडेकर पुरस्कर्ते होते.

अर्थव्यवहाराबरोबरीने समाजातील कामव्यवहारही नियंत्रित हवा. प्रगत विचार केवळ मतवाद म्हणून नव्हे, तर धर्म म्हणून स्वीकारले गेले पाहिजेत.' हे सर्व वाचत असताना लक्षात येते की, खांडेकरांचे साहित्य जितके संस्कारशील होते, तितक्याच यांच्या प्रस्तावनाही!

'समाजात रोज हजारो ययाती जन्मत, जगत असतात. त्याच समाजात एक अपवाद कच जन्म घेत असतो. तो या हजारो ययातींनी तुफानलेल्या भौतिक सागरात अचल दीपस्तंभ बनून मानवजातीचा आध्यात्मिक विकासप्रवर्तक ठरतो', हे खांडेकरांचे योगदान शिरवाडकर इथे रेखांकित करतात.

**- डॉ. सुनीलकुमार लवटे**

## असे होते माडगूळकर..!

*('बुकमार्क' या पुस्तकातील नव्याने संपादित केलेला लेख)*

काही माणसं भेटतात थोडीशी; परंतु मनात मात्र कायमची वस्तीला राहतात. मी आकाशवाणीत नोकरीला लागले, तेव्हा 'माणदेशी माणसं' आणि 'बनगरवाडी' ही व्यंकटेश माडगूळकरांची दोन पुस्तकं घराघरांत पोहोचली होती. सगळ्या व्यक्तिरेखांनी प्रत्येकाच्या मनात घर केलेलं होतं. माझ्या घरात तर मी आणि माझी भावंडं त्यांचं अगदी सामूहिक वाचन करत होतो. त्या विशीच्या वयात लेखकाचा मोठेपणा आतपर्यंत जाणवण्याइतकी माझ्यात परिपक्वता नव्हती; परंतु या व्यक्तिरेखांनी, त्या भाषेनं वेडं केलं होतं खास!

आकाशवाणीत नोकरीला लागले. तिथे आधीच कार्यरत असलेले मोठे साहित्यिक हे मला आता रोज भेटणार, बघायला मिळणार, याचं प्रचंड अप्रूप वाटत होतं. त्या वयात आवडणाऱ्या पुस्तकांचे सगळेच लेखक आपले आवडते होऊन जातात. गो. नी. दांडेकर, श्री. ना. पेंडसे, अरविंद गोखले, व्यंकटेश माडगूळकर, पु. ल. देशपांडे, आचार्य अत्रे इ. लेखक हे मनामध्ये जास्त ठसले होते. वयाच्या वाढीनुसार वाढत जाणाऱ्या परिपक्वतेनुसार, वाढत जाणाऱ्या वाचनानुसार एखाद्या लेखकाच्या शैलीच्या आपण प्रेमात पडतो आणि मग काहीच लेखक आपले जास्त आवडीचे होऊन जातात. व्यंकटेश माडगूळकर ऊर्फ तात्या माडगूळकर हे असेच माझ्या प्रिय लेखकांमधले पहिल्या स्थानावरचे लेखक. त्याविषयी पुढे सविस्तर येईलच.

तर आकाशवाणीत नोकरीला लागल्यानंतर आजूबाजूच्या वातावरणामुळे भारावलेपण वगैरे यथासांग आलं होतंच. सतत 'ताजंतवानं काहीतरी घडणं' तिथं चालू असल्यानं माझ्यासारख्या तरुण मुलीला ते वातावरण कोणतीतरी नवीन ऊर्जा देत होतं, हे निश्चित.

अजूनही व्यंकटेश माडगूळकरांचं दर्शन झालं नव्हतं. एक दिवस ड्यूटीसाठी ऑफिसच्या गेटमधून आत शिरतानाच ते तिथे उभे असलेले दिसले. ते त्यांचं पहिलं सुभग दर्शन. 'माणदेशी माणसं' लिहिणारा माणूस इतका परिपूर्ण 'शहरी' वळणात पाहायला मिळेल असं वाटलं नव्हतं. टाय लावलेला, उत्तम पोषाखातला हा देखणा माणूस खेडेगाव इतकं कसं जिवंत करत असेल, हा मला पडलेला पहिला प्रश्न.

गोरापान वर्ण, उंचपुरी देहयष्टी, कुरळे केस, बारीक डोळे आणि 'आत्ममग्न' असे चेहऱ्यावरचे भाव. रस्त्यावरच्या रहदारीकडे तंद्री लावून ते पाहत होते. आजूबाजूच्या जगाचं त्यांना काडीमात्र भान नव्हतं. ऑफिसमध्ये आल्यानंतर श्रीराम मांडे यांना मी म्हटलं, ''व्यंकटेश माडगूळकर हे फार अलिप्त वाटतात ना?'' मांडे म्हणाले, ''तात्या ना... अहो ते फक्त देहानं आपल्यासमोर असतात; बाकी ते मनातून काय पाहत असतील, कोण जाणे?'' श्रीराम मांडे म्हणजे पूर्णपणे तात्याभक्त!

मनाला डोळे असणारा माणूसच माणसातले बारीकसारीक बारकावे टिपत असावा आणि त्या माणसाला जिवंत करीत असावा, हे मनोमन पटलं. दर्शन तर झालं होतं. आता प्रत्यक्ष भेट व्हायची होती. आमच्या शिफ्ट्स असल्यानं ही मंडळी वारंवार भेटत नसत; पण मी तेव्हाही थोडंफार लिहीत असल्यानं इतर वेळीही ऑफिसमध्ये जाणं-येणं व्हायचं.

त्या वेळी श्रोत्यांच्या पत्रांना उत्तरं देण्याचा 'लोभ असावा' हा कार्यक्रम मी लिहीत असे. स्क्रिप्ट तपासण्याठी टॉक सेक्शनकडे जायचं. टॉक सेक्शन तेव्हा तात्यांकडे होतं. एक दिवस आमचे बॉस पी. वाय. जोशी यांनी मला बोलावून माझं ते 'लोभ असावा'चं स्क्रिप्ट माझ्यासमोर ठेवलं आणि म्हणाले, 'बघा जरा!' भीतीनं ब्रह्मांड आठवलं. एवढ्या मोठ्या लेखकाकडे आपलं स्क्रिप्ट तपासायला गेलं होतं. काय झालं असेल. संकोच, लाज आणि इतर बऱ्याच भावना मनात गर्दी करत होत्या. पी.वाय. म्हणाले, 'अहो बघा ना!' मी हळूच स्क्रिप्ट हातात घेतलं आणि पाहिलं तर आनंदानं काही सुधरेचना.

'वेल रिटन स्क्रिप्ट' म्हणून तात्यांचा शेरा होता. पी. वाय. जोशींच्या पलीकडे असलेल्या खोलीत तात्या बसायचे. पट्कन कुठल्याही मोठ्या माणसासमोर धाड्कन जायचा माझा स्वभाव नसूनही मी तडक तात्यांच्या खोलीत शिरले आणि त्यांना 'थँक्स' म्हणाले. ते नेहमीप्रमाणे 'दुसरीकडेच' होते; पण नंतर म्हणाले, 'कशाबद्दल थँक्स?' मी स्क्रिप्टबद्दल सांगितलं. खरं म्हणजे पत्रोत्तराच्या कार्यक्रमाचं स्क्रिप्ट. अगदी आव्हानात्मक असं काहीच नव्हतं, तरीही त्यांनी असा शेरा दिला होता, याचं मला आश्चर्यही वाटत होतं. मी त्यांना म्हणाले, ''पत्रोत्तरासारख्या लिखाणाला...'' पण, मला पुढे बोलू न देता तेच पुढे म्हणाले, ''अहो, साधंसरळ पण थेट भिडणारं असं लिहिणं जमलं पाहिजे आणि ते तुम्हाला जमलंय.'' एरवी कमीत कमी बोलणारे तात्या ऊर्फ व्यंकटेश माडगूळकर एवढी दोन पूर्ण वाक्यं माझ्याशी मनमोकळेपणानं बोलले, यातच मला भरपूर आनंद झाला.

जाता-येता गाठ पडत होती; पण अर्थातच ओळखीचं हसू, नमस्कार, बोलणं, समोरच्या माणसाची दखल घेणं यापासून तात्या फारच लांब होते. खोलीसमोरच्या व्हरांड्यातून बाहेर पाहत राहणं, क्वचित पी. वाय. जोशी, ज्योत्स्ना देवधर यांच्या खोलीत, शेजारच्या आरामखुर्चीत डोळे मिटून आराम करणं किंवा भर रहदारीच्या चौकात नुसतंच कुठेतरी बघत तंद्री लावणं, याच त्यांच्या अवस्था मी बहुतेक वेळा पाहिल्या होत्या. क्वचित कधीतरी ते गप्पा मारताना दिसायचे; पण एकंदरीत स्वभाव अलिप्त... आत्ममग्न! ऑफिसमध्ये एकंदरीत किती जणांची आडनावं त्यांना माहीत होती, याबद्दल शंकाच आहे.

पुणे रेडिओ केंद्राला पंचवीस वर्षं झाली म्हणून रौप्यमहोत्सवी वर्ष साजरं करायचं, असा फतवा निघाला होता. त्या वेळी प्रत्येक विभागानं काहीतरी विशेष कार्यक्रम करायचा, असं ठरलं होतं. त्या प्रत्येक विभागाला एकेक अनाउन्सर त्या विशेष कार्यक्रमासाठी असिस्टंट म्हणून नेमण्यात आला होता. तात्या तेव्हा भाषण आणि ग्रामीण विभाग सांभाळत होते. रौप्यमहोत्सव कार्यक्रमासाठी तात्यांच्या विभागासाठी मदतनीस अनाउन्सर म्हणून माझ्याकडे काम आलं होतं.

तांत्रिक गोष्टी म्हणजे रेकॉर्डिंग करणं वगैरे फारसं त्यांच्या आवडीचं काम नव्हतं. एक दिवस कुणातरी मोठ्या व्यक्तीचं भाषण ठरलेलं होतं. रेकॉर्डिंग मीच करणार होते; पण तात्या रेकॉर्डिंग रूममध्ये हजर होते. पहिली सगळी

सव्यापसव्यं झाल्यानंतर आता रेकॉर्डिंगला सुरुवात करायची म्हणून मी त्या व्यक्तीला समजावून सांगितलं की, हा समोरचा लाल दिवा लागला की, तुम्ही वाचायला सुरुवात करा. ते गृहस्थ (नाव आठवत नाही) बरेच घाबरलेले होते. स्टुडिओमधला लाल दिवा हा भल्याभल्यांना घाबरवून सोडतो, हे आत्तापर्यंतच्या अनुभवावरून मला चांगलंच परिचयाचं झालं होतं. सूचना देऊन झाल्यानंतर मी रेकॉर्डिंग रूममध्ये येऊन घड्याळाकडे पाहून ठरावीक वेळेला रेकॉर्डर सुरू केला. मधल्या काचेतून त्या गृहस्थांना खूण करून लाल दिवा लावला. ते गृहस्थ आता बोलतील, मग बोलतील, म्हणून मी वाट पाहत होते. तात्यांनी तंद्रीत डोळे मिटून घेतले होते; पण ते गृहस्थ बोलायला तयारच होईनात. मी रेकॉर्डर बंद केला आणि त्यांच्या रूममध्ये जाऊन त्यांना पुन्हा सगळ्या सूचना दिल्या. असं साधारण पाच-दहा मिनिटं आमचं चाललं होतं. त्या गृहस्थांना खूपच दडपण आलं होतं. साधारण दहा मिनिटांनी तात्या तंद्रीतून जागे झाले आणि घाईघाईने त्यांनी मला विचारलं, 'झालं का?' मी हसतच तात्यांना सांगितलं, 'ते खूप घाबरलेत.' तात्या गडबडीनं म्हणाले, 'असं आहे होय? मग मला आता वाटतंय की, तुम्हीच हे वाचावं.... कशाला उगाच आपला वेळ घालवावा... नाही का?' मी हो म्हटलं. पुढचं ठरलेलं रेकॉर्डिंग रद्द केलं. तात्या त्या गृहस्थांना घेऊन बाहेर गेले. पुढे यथावकाश माझ्या आवाजात मी ते रेकॉर्डिंग पूर्ण केलं...

नंतर तात्या एवढंच म्हणाले, ''मोठी माणसं सगळीकडेच मोठी नसतात.'' त्यांचं नेहमीचं कमीत कमी शब्दांतलं पण अर्थपूर्ण वाक्य...

'करुणाष्टक' प्रसिद्ध झालं, तेव्हाची गोष्ट! आम्ही ठरलेले तात्यांच्या लिखाणाचे परमभक्त एकत्र येऊन सतत करुणाष्टकावर बोलत असायचो. एकदा श्रीराम मांडे तात्यांच्या खोलीतून येऊन खाली आले. मांडे उत्तम नकलाकार. चेहऱ्यावर काहीही न दर्शविता एकदम त्या विशिष्ट व्यक्तीची नक्कल हुबेहूब करायचे. काही क्षणांनी आमच्या लक्षात यायचं की, अरेच्चा! अमुक माणसाची नक्कल चाललीय. तर त्या दिवशी खाली आले... मला म्हणाले. ''बाई, माणसानं इतकं निर्लेप असावं? कौतुकसुद्धा इतकं निर्लेप वृत्तीनं शांत राहून स्वीकारावं? मी आता वरती गेलो बघा. 'करुणाष्टक'बद्दल साष्टांग नमस्कार घालूनच मला सांगायचं होतं. ''मी त्यांना म्हटलं, अहो तात्या, हे असलं जीवघेणं लिहून तुम्ही आमचा छळ करता. असं काळजात

घुसणारं तुम्ही लिहिता आणि आमची पंचाईत होते.''

मी त्यावर मांडे यांना विचारलं, ''तात्यांची प्रतिक्रिया काय?'' झालं! मांड्यांच्या अंगात तात्या संचारले. हुबेहूब त्यांच्याचसारखी ढब घेऊन डोळे मिटून, गालातल्या गालात हलकं हसून दोन्ही हात पॅन्टच्या खिशात ठेवून त्यांनी जमेल तसं तात्यांच्या आवाजात सांगितलं, ''अहो मांडे, इतके व्याकूळ होऊ नका.''

पुढे मला मांडे म्हणाले, ''झाला का नाही आमचा फालुदा? काय म्हणावं या माणसाला बाई? एवढीही चेहऱ्यावरची रेष हलली नाही बघा. याला मी निर्लेप म्हणतो. मारे गेलो कौतुक करायला आणि तात्यांनी माझा फसफसता उत्साह एकदम शून्यावर आणला.'' तात्या अगदी अघळपघळ बोलणारे नसले, तरी त्यांच्या परिचितांमध्ये ते काही वेळा गप्पा मारताना दिसायचे; पण एकूण मामला म्हणजे सतत 'स्वत:मध्ये' असलेला. माझं वय वाढत होतं, तसतसं त्यांच्या पुस्तकांचं वाचनही वाढत चाललं होतं. काही गोष्टी हळूहळू कळत होत्या. त्यांची अल्पाक्षरी भाषा आणि अल्परेषांतली रेखाटनं यांतून माणसांचं आरपार अंतरंग ते उलगडून दाखवत होते.

''वयाच्या विशीपर्यंत मरण हे काव्य असतं, पन्नाशीनंतर ते उदास असं गद्य होतं! पिकलं पान गळून पडायचंच हे शहाणपण आपल्या आईबद्दल स्वीकारणं फार अवघड जातं. हे मरण स्वाभाविक नसतं. माहीत असूनही तो अपघातच असतो!'' कुठेही आलंकारिकपणाचा देखावा नसलेली त्यांची खोल भिडणारी भाषा काहीतरी निराळेपणाचं लेणं घेऊनच आली होती.

साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाल्यानंतर स्टाफतर्फे आम्ही त्यांचा सत्कारसोहळा आकाशवाणीच्या मागच्या अंगणातल्या छोट्याशा खोलीत साजरा केला होता. मी स्वतः फक्त पांढरे गुलाब असलेला मोठा गुच्छ नेला होता. गुच्छ त्यांना दिल्यानंतर म्हणाले, ''अरे वा! फक्त एकाच रंगाच्या फुलांचा गुच्छ छान दिसतो, हे आज समजलं.'' जवळजवळ दहा वर्षं त्यांच्या काळात माझी नोकरी चालू असताना मधूनमधून संपर्क येत होता, जुजबी बोलणंही होत होतं. एकीकडे त्यांची पुस्तकं वाचतानाच, प्रत्यक्षात मी त्यांना पाहत होते. त्यांचं सतत स्वत:त असणं, कुणाच्या अध्यातमध्यात नसणं, ऑफिसच्या राजकारणात काडीमात्र रस नसणं हे कुठेतरी मनात ठसत होतं. या त्यांच्या अलिप्ततेची उत्तरं त्यांच्या पुस्तकांमधून मिळत होती. काही

संदर्भ लागत होते. कविराजांबद्दल, आईबद्दल लिहितानाचं त्यांचं हळवेपण ठसठशीतपणे जाणवत होतं. स्वत:च्या जीवनाकडे पाहण्याची त्यांची निराळी दृष्टी 'चित्रकथी' या पुस्तकाच्या शेवटी लिहिलेल्या त्यांच्या मनोगतामध्ये जाणवत होती.

''शेतं पिकत होती, डोलत होती, पक्व झाली की कापली जात होती. झाडं वाढत होती, सुकत होती, वठत होती, जळणाला जात होती. फुलणं, बहरणं, सुकणं आणि नव्याला वाट करून देणं चालू होतं. जमीन धीर सोडत नव्हती. या झाडाझडोऱ्याचा मीही एक भाग नव्हतो का? मग मी तरी खिन्न का व्हावं? धीर का सोडावा? माझी दु:खं म्हणजे लहानलहान पस्तावे होते. एकूण पाहता जीवन चविष्ट आणि आनंदाचंच होतं.'' मी नोकरी सोडल्यानंतर खूप वर्षांनी मी आणि शैला मुकुंद अशा आम्ही दोघींनी केलेला 'विश्ववामा' कार्यक्रम चालू होता. ते आजारी पडण्यापूर्वी प्रभात रोडलाच मला एकदा चालत असताना भेटले. ते तंद्रीत चालले होते. मी आपण होऊन बोलायला गेले. विश्ववामाबद्दल मी सांगितलं. तेवढ्या अल्पवेळात त्यांनी काही संदर्भही दिले. ती शेवटची भेट. अत्यंत कमी बोलणारे आणि भरपूर लिहिणारे प्रसिद्ध लेखक व्यंकटेश माडगूळकर ऊर्फ तात्या किमान दहा वर्षं तरी माझ्यासमोर वावरले.

व्यंकटेश माडगूळकरांच्या साहित्याविषयी लिहिल्याशिवाय लेख पूर्ण होणार नाही. त्यांचं मला सर्वांत आवडलेलं पुस्तक म्हणजे 'करुणाष्टक'! आई या नात्याबद्दल अनेक लेखकांनी आतापर्यंत लिहिलेलं आहे; परंतु व्यंकटेश माडगूळकर अत्यंत कमीत कमी शब्दांत खूप मोठं काहीतरी जीवनाचं तत्त्वज्ञान सांगून जातात. आई गेल्यानंतर त्यांनी लिहून ठेवलय, ''आई गेली... एक लांबलचक प्रवास संपला... पिकलं पान गळून पडायचंच... हे शहाणपण आपल्या आईबद्दल स्वीकारणं फार अवघड जातं. हे मरण स्वाभाविक नसतं. माहीत असूनही तो अपघातच असतो... आई गेली की, माणसाचं बरंच काही जातं.'' बारा बलुतेदारांच्या खेडेगावात लहानपण गेलेला हा लेखकच 'बनगरवाडी' आणि 'माणदेशी माणसं' लिहू शकतो.

अशा बहुआयामी व्यक्तिमत्त्वाला मला बघता आलं, भेटता आलं, हा माझ्या आयुष्यातील सुरेख योग!

**- प्रज्ञा ओक**

◆

## भावस्मरण




# ययाति

### वि. स. खांडेकर

पृष्ठे : ४४२
किंमत : ३७५

*वि. स. खांडेकर...वाङ्मयाच्या इतिहासातलं एक महत्त्वपूर्ण नाव...'समाजासाठी कला' ही एक स्वीकृत भूमिका घेऊन मराठीचे कादंबरीविश्व समृद्ध करणारे आणि मराठी साहित्याला विविध आकृतिबंधांनी भिडणारे पहिले ज्ञानपीठविजेते साहित्यिक वि. स. खांडेकर... हे वर्ष वि. स. खांडेकर यांचं सुवर्ण स्मृतिवर्ष आहे... त्यानिमित्ताने त्यांच्या ज्ञानपीठविजेत्या कादंबरीच्या वेच्यातून त्यांचं केलेलं हे भावस्मरण...*

माधवाचा शेवटचा निरोप घेऊन मी परतलो. ती रात्र! छे! रात्र कसली? क्षणाक्षणाला फूत्कार करीत माझ्या अंगावर चालून येणारी काळी नागीण होती ती!

माझे मन पुनःपुन्हा मृत्यूचा विचार करीत होते. त्या विचारांच्या भयंकर भोवऱ्यातून काही केल्या मला बाहेर पडता येईना. देवयानीने यावे, माझ्याजवळ बसावे, माधवाच्या मृत्यूबद्दल हळहळावे, तिच्या मांडीवर डोके ठेवून मी त्याच्या गुणांचे तिच्यापाशी वर्णन करावे आणि तिच्या डोळ्यांतले अश्रू माझ्या अश्रूंशी मिसळले, म्हणजे मग तिच्या बाहुपाशात झोपी जावे– एखादे भ्यालेले बालक आईच्या कुशीत निर्धास्तपणे झोपते, तसे शांतपणे निद्रेच्या अधीन व्हावे– असे मला फार-फार वाटत होते. पण 'माधव गेला, म्हणून ऐकलं. फार वाईट झालं.' या शब्दापलीकडं तिने एकही अधिक-उणा शब्द उच्चारला नाही; 'माझी अन्नावर वासना नाही', म्हणून सांगितले, तेव्हा 'दोन घास तरी खा' असा आग्रह केला नाही आणि मी माझ्या महालात जाऊन तळमळत पडल्यावर ती तिकडे फिरकलीसुद्धा नाही!

किती तरी वेळ मी शून्य मनाने बाहेरच्या काळोखाकडे पाहत उभा होतो.

त्या काळोखात एकाएकी राजमार्गावर एक रथ दिसू लागला. तो रथ वेगाने, मी उभा होतो, त्या दिशेनेच येत होता; पण त्याच्या चाकांचा आवाज बिलकूल होत नव्हता. त्या रथाला जुंपलेल्या काळ्या घोड्यांच्या टापांचाही आवाज होत नव्हता. होय, त्या काळोखातही ते काळे-काळे घोडे मला स्पष्ट दिसत होते– मी टक लावून पाहत होतो, माझ्या डोळ्यांवर माझा विश्वास बसेना. बागेतल्या सर्व फुलझाडांचा चोळामोळा करीत तो रथ सरळ पुढे आला– मी उभा होतो, त्या खिडकीपाशी येऊन तो थांबला. सारथ्याने हळूच विचारले.

'चलायचं ना, महाराज?'

मी म्हणालो,

'महाराणी झोपली आहे. छोटा यदु झोपला आहे. त्यांचा निरोप घेतल्यावाचून...'

माझे पुढचे शब्द मलाच ऐकू आले नाहीत. पाहता-पाहता त्या सारथ्याचा हात लांब लांब झाला, खिडकीपर्यंत येऊन पोचला, एखाद्या फुलझाडावरले फूल खुडावे, तसे त्याने मला अलगद उचलले आणि आपल्या रथात नेऊन ठेवले.

रथ चालू लागला. हस्तिनापुरातली एक-एक चिरपरिचित जागा मागे पडू लागली, हे देवालय, ही नृत्यशाळा, हे माधवाचे घर, लहानपणी नगरदेवतेच्या उत्सवात त्या उन्मत्त घोड्यावर बसून मी जिथे पराक्रम गाजविला होता, ते हे विशाल क्रीडांगण–

रथ धावत होता, वाऱ्याच्या वेगाने! हे-हे अशोकवन मागे पडले.

आता मला राहवेना. मी सारथ्याला विचारले,

'रथ कुठं चाललाय्?'

उत्तर आले :

'मला ठाऊक नाही!'

'आपण परतणार कधी?–'

'मला ठाऊक नाही!'

मी चिडून विचारले,

'मग तुला काय ठाऊक आहे?'

'फक्त दोन नावं!'

'ती कोणती?'

'पहिलं महाराजांचं–!'

'आणि दुसरं?'

'माझं स्वतःचं–!'

'तुझं नाव काय?'

'मृत्यु–!'

किती भयंकर भास होता तो! त्या खिडकीच्या गजांना दोन्ही हातांनी मी घट्ट धरले, तरी भीतीने थरथर कापणारे माझे शरीर खाली कोसळून पडते, की काय, असे मला वाटू लागले.

मोठ्या कष्टाने मी मंचकावर येऊन बसलो; पण छाती धडधडत होती. पाय थरथरत होते. मन क्षणभरसुद्धा स्थिर होत नव्हते.

मी पुनःपुन्हा मद्य घेतले. भरपूर मद्य घेतले.

दोन-तीन घटकांनी मला बरे वाटू लागले. हळूहळू गुंगी आली; पण त्या गुंगीत मला एक भयंकर स्वप्न पडले. त्या स्वप्नात माझ्यासमोर एक चिता जळत होती. त्या जळत्या चितेत माझ्या एकेका अवयवाची राख होत होती.

बघता-बघता माझे डोळे, कान, ओठ, हात-पाय यांची राख झाली! आता

त्यांचा मला काही उपयोग नव्हता. माझ्या डोळ्यांना मुग्ध तरुणीप्रमाणे भासणारी सौम्यसुंदर सकाळ पुन्हा दिसणार नव्हती. उग्र आणि उत्तेजक मद्याप्रमाणे अमृताने भरलेल्या संजीवक ओठांचा स्पर्श पुन्हा माझ्या ओठांना होणार नव्हता.

फुललेल्या सोनचाफ्याचा आणि पिकलेल्या अननसाचा गोड वास जसा पुन्हा माझ्या नाकाला लाभणार नव्हता, तसा दृढ आलिंगनाने एकजीव झालेल्या प्रेयसीच्या केशसंभाराचा सौम्य सुगंधही मला पुन्हा घेता येणार नव्हता.

हे दृश्य पाहता-पाहता माझी गुंगी पार उडाली. मी मंचकावर उठून बसलो. छाती धाडधाड उडू लागली. जणू मृत्यूची भीती माझ्या हृदयावर घावामागून घाव घालीत होती आणि त्या घावांचे प्रतिध्वनी मला ऐकू येत होते!

पारधी मागे लागलेला पाहून हरिणाने जिवाच्या आकांताने पळत सुटावे, तसे माझे मन सैरावैरा धावू लागले. त्याला मद्याखेरीज दुसरे आश्रयस्थान सापडेना.

कितीतरी वर्षांत इतके मद्य मी घेतले नव्हते. हळूहळू त्याची धुंदी मला चढली. तो उन्माद दुसऱ्या उन्मादाची आठवण करून देऊ लागला. मुकुलिका, अलका, शर्मिष्ठा, देवयानी यांच्या कमनीय आकृती माझी वासना चेतवू लागल्या. डोळ्यांपुढे तरळू लागल्या.

अलका खाली वाकून केसांतल्या वेणीचा वास मला देत होती. तो वास घेता-घेता मी धुंद होऊन गेलो. ती दूर होऊ लागली. लगेच मी ती वेणी तिच्या केसांतून हिसकावून घेतली. दोन्ही हातांनी त्या फुलांचा चोळामोळा करीत ती नाकापाशी नेली. कंपित स्वरात अलका उद्गारली,

'असं काय करावं, युवराज?'

मी उत्तर दिलं,

'अजून माझं समाधान झालं नाही! आणखी, आणखी सुगंध हवाय् मला!'

अलकेला बाहुपाशात घट्ट धरून तिच्या ओठांचा, डोळ्यांचा, केसांचा, गालांचा सारा सारा सुगंध पिऊन टाकण्याकरिता मी बाहू पसरले. पण– मी डोळे उघडून पाहिले– पुन्हा पुन्हा पाहिले. माझ्या महालात मी एकटाच होतो; आणि अलका? ती कुठे आहे? तळघरात? छे! का दुसरीकडेच कुठे लपून बसली आहे! सशाच्या बिळात, का सिंहाच्या गुहेत?'

'अलका, अलका!...' मी मोठ्याने हाक मारली.

कुणी तरी ओ दिली; पण ती अलका नव्हती. ती मुकुलिका होती. ती

कुठे होती? दूर? छे! माझ्या बाहुपाशात! मी तिची चुंबने घेत होतो. मी मला चुंबने देत होती. मी आकाशातले एकेक नक्षत्र मोजीत होतो आणि तिचे एकेक चुंबन घेत होतो! नक्षत्रे मोजून संपली, की मी माझी चुंबने थांबविणार होतो; पण-पण माझ्या ओठांना हे गारगार असे काय लागतेय्? मुकुलिका कुठे आहे? माधवाच्या घरी ती त्याची सेवा करीत आहे! पण, माधव कुठे आहे? तो-तो मृत्यूचा हात धरून– माझ्या ओठांना गारगार असे जे काही लागले, तो मृत्यूचा हातांचा स्पर्श होता काय?

मी पुन्हा डोळे उघडून पाहिले. माझ्या महालात मी एकटाच होतो. कदाचित मृत्यू माझ्याभोवती अदृश्य स्वरूपात फिरत असेल! ही माझ्या आयुष्यातली शेवटची रात्र असेल काय? कुणी सांगावे? या शेवटच्या रात्रीचा आनंद लुटू दे; पुरेपूर उपभोगू दे. आयुष्याचा रिकामा होत असलेला हा प्याला एकदाच, एकदाच फेसाळणाऱ्या स्त्रीसुखाच्या मद्याने भरून जाऊ दे. शेवटचा प्याला– हो शेवटचा प्याला!

'शर्मिष्ठे– शर्मिष्ठे– शमा, शमा–'

मी उठलो. पाय लटपटत होते. शरीराचा तोल सावरता येत नव्हता. तरी मी उठलो आणि महालाचे दार खाडकन् उघडून चालू लागलो.

◆

# भावस्मरण







**व्यंकटेश माडगूळकर**

पृष्ठे : १२८
किंमत : १८०

*व्यंकटेश माडगूळकर...वाङ्मयाच्या इतिहासातलं एक झळाळतं पान... नवकथेच्या बिनीच्या शिलेदारांमध्ये समावेश झालेले, साध्या-सोप्या भाषेतून वाचकांच्या अंतरंगात शिरणारे...मराठी साहित्यात विविध आकृतिबंधांद्वारे वैशिष्ट्यपूर्ण योगदान देणारे साहित्यिक...हे वर्ष व्यंकटेश माडगूळकर यांचं जन्मशताब्दी वर्ष...त्यानिमित्ताने त्यांच्याच अक्षर वाङ्मयातून केलेलं हे भावस्मरण...*

## मुलाण्याचा बकस

माझ्या खेड्यापासून तालुक्याचं गाव अगदी जवळ आहे; पाचएक मैल. हे आपलं अंदाजानं, कारण पक्की सडक नाही. त्यामुळे मैलाचे धोंडे नाहीत. ओबडधोबड गाडीवाट आहे. आजूबाजूला सारा बोडका माळ आहे. पाच मैलांच्या प्रवासात तहान लागली, तर वाटेला कुठे पाणी मिळत नाही. झाडंसुद्धा सावलीला होतील अशी नाहीत. नेपती-बोरीची बारीकसारीक झुडपं आहेत. दुपारच्या वेळी निघालं म्हणजे सगळ्या वाटेत माणूस क्वचितच दृष्टीस पडतं. चुकून-माकून एखादा मेंढक्या आणि मुंड्या खाली घालून गवत खाणारी त्याची मेंढरं जवळपास दिसतात. एरवी सारा शुकशुकाट! भुतासारखं एकट्यालाच जावं लागतं. असं उन्हात तळत, फुफाटा तुडवीत मला नेहमी

जावं-यावं लागे; पायी-पायीच. तेव्हा गावची शीव ओलांडली की, मी एखादा विचार डोक्यात घेई आणि त्या नादात पाऊल उचली. माझ्या कित्येक गोष्टींची कथानकं या प्रवासात मला सुचली आहेत. त्या तंद्रीत तीन- साडेतीन मैल संपून मुलाणकी केव्हा आली, हे कळायचंही नाही.

मुलाणकी आली की, जरा बरं वाटायचं. 'मुलाणकी' म्हणजे मुलाण्याच्या मालकीच्या चार जमिनी तिथं एका तळावर आहेत. सगळ्या वाटेत तेवढेच चार काळे डाग आहेत. मधून आडवा असा एक छोटा ओघळ गेला आहे. त्याला पाणी कधी नसतं, पण काठाला करंजीची-लिंबाची चार मोठी झाडं आहेत. निरगुडी-तरवडाचं बन आहे. त्यामुळे तिथं आलं की, घाम पुसून क्षणभर सावलीला बसता येई. तेवढंच बरं वाटे; आणि पुन्हा आता गाव एक-दीड मैलावर आलं, या जाणिवेनंही जीव सुखावे. बकसची आणि माझी ओळख इथं झाली. एकदा असाच ऐन उन्हाचा चालून आलो आणि मुलाणकीत करंजाच्या सावलीत बसलो. दमलो होतो. घामानं थबथबलो होतो. रानात उभं पीक नव्हतं. त्यामुळे आजूबाजूला कोणी नव्हतं. गार सावलीत जरा बरं वाटलं. वाळूत कलंडून इकडं- तिकडं पाहू लागलो.

तेवढ्यात पलीकडची डगर उतरून बकस आला. माझ्या रोखानंच आला. फाटक्या अंगलटीचा बकस पायांतली सहा आणेवाली टायराची पायताणं ओढत  आला आणि फार दिवसांची ओळख असल्यासारखा हसून बोलला,

''बसला सावलीला? दमला असाल उन्हात. लई लागलं का ऊन? लई न्हाई तरी थोडं लागायचंच.''

–आणि गुडघ्यावर फाटलेला मुसलमानी चोळणा वर सरकावून खाली वाळूत बसला. गावात मी त्याला कधीकधी पाहिला होता. इथं मुलाणकीत वाटेनं येतानाही पाहिला होता, पण ओळख अशी नव्हती. बकस वयानं वीस-बावीस एवढा असावा. त्याचं बोलणं एखाद्या लहान मुलासारखं होतं आणि चेहऱ्यावरले भावही तसेच. त्याच्या उगीचच हसण्यावरून आणि डोळे फिरविण्यावरून मला वाटलं की, हा अर्धवट असावा.

''मग इतक्या उनाचं कशापायी निघाला? पन काम असल्यावर निघालंच पायजे. ऊन म्हनून भागतंया का, ऑ?''

त्याचं बोलणं बोबडं आणि जलद होतं. आपण प्रश्न विचारावेत आणि आपणच त्यांची उत्तरं द्यावीत, अशी खोड त्याला असावी.

''बायशिकलीवरनं आला असता, तर आत्ता पोचला असता गावात. हाय

का तुमची? नसंल. कुठली असतीया! मग चालत का आला असता? आन् असली तरी बिघडल्यावर तिचा काय उपेग? खरं का न्हाई?''

एवढा वेळ मी गप्पच होतो. त्याचा उन्हानं कोळपलेला चेहरा, हनुवटीवरची तांबूस खुटरं, चिरफाळ्या झालेलं कुडतं आणि जास्त फाटल्यामुळे त्यानं चोळण्याला मारलेल्या गाठी हे सगळं न्याहाळत होतो.

त्याच्या 'खरं का न्हाई?' या प्रश्नावर मी स्मित करून मान डोलविली. बकसचा चेहरा उजळला. आपल्यालासुद्धा कळतं आणि दुसऱ्याला ते पटतं, या जाणिवेनं तो आपल्याशीच हसला आणि लाजल्यासारखा चेहरा करून कुठंतरी बघू लागला.

''तुझं नाव रे काय?''

''अल्लाबकस म्हनत्यात मला!''

''अल्लाबक्ष, तू कुणाचा? तांबोळ्याचा काय?''

''न्हाई, मी मुलाण्याचा. बाबालालचा पोरगा. तुमाला ठावं असंल? नसंल. तुमी कशाला बघताय! मेला तो. लई दिस झालं. माबी मेली. चांगली हुती. मला म्हनायची, ''बकस मेरा लाल है.'' म्हनायची, ''तुझी शादी करायची.'' चांगली हुती, पर मेली.''

''आता तुला कोण आहे? कुणापाशी राहतोस?''

''चुलता हाय. गवंडीकाम करतो. त्याच्यापाशीऱ्हातो. हे रान त्याचंच. शेरडं त्याचीच. मी राखतो. चुलती नीट बघत न्हाई. म्हनती, ''येडसर हाय, खुळं हाय.'' मी खुळा हाय् व्हय वं? येडसर हाय?''

''छे! मुळीच नाही. तू शहाण्यासारखा बोलतोस.''

''चुलतासुदीक येडा म्हनतो. गावातली पोरं म्हनत्यात, 'येडा बकस'. चुलती नीट बघत न्हाई. भाकरी देत न्हाई. उपाशी ठेवती. म्हनती, ''मरंनास का एकदा, आमाला का तुजा कार?'' आता कसं मरावं?''

''रानात एकटाच येतोस का शेरडं घेऊन?''

''व्हय, एकलाच येतो सकाळी भाकरी घेऊन. दिवस मावळायला जातो माघारी, शेरडं जोगावल्यावर. चुलता म्हनतो, 'तुजा का आमाला तरास? मर जा.' आता माजा कशाचा वं कार? मी इळभर रानात असतो, राती मशिदीत पडतो. मग?''

वेडा बकस सांगत होता. मी ऐकत होतो. त्यानं 'मग?' म्हणून विचारल्यावर मी काय सांगणार? म्हणालो, ''हे खरं नव्हे त्यांचं. त्यांनी असं म्हणू नये.''

बकस हसला. त्यानं डोळे फिरवले आणि धांदलीनं उठला.

''शेरडं जात्याल माजी!'' असं म्हणून डोक्यावरली लहान टोपी हातानं दाबीत आणि पायताण ओढीत पळत डगरीआड झाला.

त्यानंतर बकस मला अनेकवार भेटला. कधी गावाकडून रानाकडं येताना त्याची गाठ पडे – डोक्यावर फडक्यात बांधलेली भाकरी, हातात पाण्यानं भरलेलं लोटकं, दुसऱ्या हाताला ढाळे तोडायची कुऱ्हाड, एखादं गुंडाळलेलं चूहाट. शेरडांच्या घोळक्यातून बकस येत असायचा – लळत-लोंबत, रख्ख उन्हात पाय ओढीत. मला पाहताच कधी नुसता हसून पुढे जायचा. कधी थांबून, ''का मास्तर, आज ऊन केलं?'' म्हणून एखाद-दुसरा शब्द बोलायचा. कधी मुद्दाम सावलीला बसवून घेऊन चुलता-चुलतीच्या तक्रारी सांगायचा. त्याच्या नेहमीच्या बोलण्यात 'चुलती नीट बघत नाही, भाकरी घालत नाही' ही तक्रार हमखास असे. चुलता आपल्याला वेडसर म्हणतो. 'मी काय वेडसर हाय?' हा दावाही नित्याचा.मागाहून मला कळलं की, तो कुणापाशीही हेच बोलत असे. थट्टा न करता जे त्याच्याशी नीट बोलतील, त्यांना तो याच तक्रारी ऐकवत असे. त्याच्या मनाचं हे दुखणं अनावर असावं.

कधी दिवस मावळायच्या सुमारास मी जायला आणि बकस रानातून घरी जायला गाठ पडे. मग त्याच्याबरोबरच मीही गावापर्यंत जाई बोलत-चालत. त्याच्याशी बोलण्यात क्वचित मजा वाटे. एरवी त्याच्या दु:खामुळेच त्याच्याशी दोन शब्द बोलावेत, असं वाटे. त्याच्या बोलण्यानं करमणूक होई; पण एकीकडं मन हळहळे, जिव्हारात बोचल्यासारखं होई.

कधी मजेत मी बकसला विचारलं, ''काय बकस, मग शादी कधी करणार तू? दे की एकदा बार उडवून!'' म्हणजे तो लाजायचा. वाढलेली दाढी खाजवीत खाली मान घालून म्हणायचा, ''का करायची आपल्या गरिबाला शादी? पैका कुठून आनावा? बायकूला खायाला काय घालावं, तिचा साडीचोळी कशाची आनावी?'' कधी खुशीत आला म्हणजे आपणच सांगायचा, ''आता शादी करायची मास्तर! झोकात करायची! धा बकरी कापायची. पन इतकी का करायची हैत न्हाई? आपली दोन-चार कापावी. तुमी येयाल का जेवायला? कुठलं येताय तुम्ही बामन!'' आणि हसायचा खूप मोठ्यानं.

नांगरट झाली तेव्हा चुलत्याच्या बरोबरीनं 'दा, दा' करून नांगर हाकताना बकस मला आढळला. पेरणीच्या वेळीही चाड्यावर मूठ धरायला तो होताच. मुलाणकीचे काळे डाग जोंधळ्याच्या ताटांनी हिरवेगार झाले. पोटऱ्यातून कणसं

फुटली, त्यांच्यावर निळाजांभळा फुलोरा आला. दाणा भरला. माचव्यावर उभं राहून पाखरं हाकलण्यासाठी बकसनं केलेला आरडाओरडाही माझ्या कानांवर आला. पुढे-पुढे मुलाणकीत खोपही दिसू लागली. बकस आता कामाच्या ओझ्याखाली होता.

एकदा मुद्दाम वाकडी वाट करून मी त्याच्या खोपीकडे गेलो. त्याचा आवाज ऐकू येत होता, ''शानी माजी बाई, माजं ऐक. असं करू नगं. हे बघ, माझ्याकडं बघ!''

मी पुढं होऊन पाहिलं, तर तो शेळीला गोंजारून तिच्याशी बोलत होता. तो लाजून म्हणाला, ''या मास्तर!''

खोपीतलं घोंगडं, कंदील, पाण्याची केळी बघून मी विचारलं, ''रात्री इथंच असतोस?''

''व्हय, राखणीपायी-हातो हतंच. बैल असत्यात. कुत्रं हाय सोबतीला!''

''म्हणून काय झालं? भीती नाही वाटत?''

''कशाची भीती? कोन खातंय आपल्याला? आन खाल्लं तरी बरंच.''

बघता-बघता बकस कष्टी झाला. म्हणाला, ''एवढी राखण करतो, पण आपली चार हुरड्याच्या कणसावर सत्ता न्हाई. फुकटची चाकरी!''

त्याच्या अशा बोलण्यानं तो अर्धवट होता, यावरसुद्धा विश्वास बसत नसे. काढणी, मोडणी, मळणी या साऱ्या वेळी बकस होताच. जोंधळ्याची पोतीही त्यानं गाडीत भरून गावात पोचवली. बकस राबत होता. वेडसर म्हणून शहाणा चुलता त्याला राबवून घेत होता.

–अलीकडे बकस एकदा मुलाणकीत आढळला. वाळूत उगाच बसून राहिला होता. कुठंतरी बघत होता.

मी विचारलं, ''कसं काय बकस?''

तो बोलला नाही की हसला नाही. जवळ गेल्यावर म्हणाला, ''बघा!'' आणि पाठ फिरवून त्यानं कुडतं वर करून दाखवलं. सात-आठ ठिकाणी भाजलं होतं. बोटाएवढे काळे-निळे वळ उठले होते.

''काय रे हे?''

''चुलत्यानं डागलंय, खुरपी तापवून डाग दिल्यात. डागल्यावर येड लागलेलं मानूस बरं हुतं. मी काय वेडा हाय का? आं?''

लहान मुलासारखा ओठ पुढे काढून बकस विचारत होता. त्याचे डोळे डबडबले होते! ◆

## पुस्तकाच्या पानांतून




# जहांगीर

**पार्वती शर्मा**

अनुवाद

**प्रशांत तळणीकर**

पृष्ठे : २५६
किंमत : ३७०

*मुघल सम्राटांपैकी सर्वांत आकर्षक आणि कला व निसर्ग साधनेचा परिपाठ गिरवणारा संवेदनशील राजकुमार सलीम अर्थात जहांगीरची जीवनगाथा*

सलीमच्या प्रत्येक कहाणीची सुरुवात त्याच्या वडिलांपासून होते. आपल्या आत्मचरित्राच्या दुसऱ्या ओळीमध्ये तो लिहितो, 'माझे वडील अठ्ठावीस वर्षांचे होईपर्यंत त्यांचे एकही मूल जगले नाही.'[१]

त्याचे वडील म्हणजे अकबर; आणि सलीमच्या दृष्टीने आनंदाची आणि दु:खाचीही बाब म्हणजे अकबर हे अशा दुर्मिळ ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांपैकी एक व्यक्तिमत्त्व होते; ज्याच्या नावापुढे काहीएक बिरूद वा पुस्ती लागतेच

लागते. अकबराच्या बाबतीत बिरूदं होती 'महान'. अकबराच्या महत्त्वाकांक्षा आणि त्याने साध्य केलेल्या गोष्टी अचाट होत्या. त्याचा करिष्मा त्याच्या कारकिर्दीबद्दलच्या प्रत्येक नोंदीमध्ये झळकतो. एक युरोपीय लेखक[२] लिहितो- 'त्याचे डोळे समुद्राच्या पाण्यावर पडणाऱ्या सूर्यकिरणांच्या तेजाने चमकत असत. तो जणू मौज करावी तसा मदमत्त हत्तींना शांत करत असे. त्याने मिळवलेल्या सलग विजयांमुळे त्याचे साम्राज्य इतके मोठे आणि समृद्ध झाले की, त्यामुळे पृथ्वीचा तोल ढळावा. अकबराचा कुठल्याही प्रकारच्या ईश्वरावर विश्वास होता की नाही हे कधीच स्पष्ट झाले नसले, तरी त्याच्या कारकिर्दीच्या अखेरीस काही लोक (कदाचित स्वत: अकबरासहित) अकबर स्वत:च एक देव होता, हे मानायला तयार झाले होते.

मात्र वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षी त्याला हवे होते-मूल. अगदी सामान्य गोष्ट, जी खरे तर आपोआप होतेच, ती त्याला काही मिळत नव्हती. ज्याला अख्खे जग न मागताच मिळाले होते तो जर अपत्याची भीक मागू लागला, तर ते त्याला मिळणार नाही? अकबराचा पूर्णवेळ चरित्रलेखक, जवळचा मित्र आणि (तसे पाहिले तर) त्याचा प्रमुख खुशमस्कऱ्या अबुल फझल. त्यालाही कळेनासे झाले की, याने मागायचे ठरवले, तर कुठला अलौकिक मोती याला मिळणार नाही?

पण प्रत्यक्ष परमेश्वरालादेखील हे काम अवघड असावे, असे भासत होते. सलीम पुढे लिहितो, 'माझे वडील दरवेश आणि साधूसंन्याशांची नेहमीच सेवा करत असत.' मात्र त्याचा काहीही उपयोग झाला नाही. तो संत महात्म्यांकडे गेला, देवाची करुणा भाकली, त्याने या संतमहंतांनादेखील आपल्याकरता देवाची प्रार्थना करायला सांगितले. त्याचे सर्वांत आवडते संत, ख्वाजा मोईनुद्दीन चिश्ती यांना त्याने साकडे घातले आणि नवस केला: मला एक मुलगा द्या, मी आग्र्याहून अजमेरपर्यंत चालत येऊन तुमच्या पवित्र दर्ग्यावर तुमचे आभार मानेन.

अखेर एक दिवस देवाने त्याचे म्हणणे ऐकले. काही दरबारी अकबराकडे येऊन त्याला सांगू लागले की, एक अत्यंत आदरणीय वृद्ध साधू आहेत. त्यांची तपस्या आणि आध्यात्मिक शक्तीबद्दल लोक अगदी भारावून बोलतात. तेदेखील चिश्ती संप्रदायातलेच आहेत आणि आग्र्यापासून जवळच एका डोंगरावर राहतात. त्यांचे नाव आहे सलीम.

अकबर मग शेख सलीम चिश्तींकडे नियमितपणे जाऊ लागला, प्रार्थना करू लागला आणि त्यांनाही आपल्याकरता प्रार्थना करण्याची विनंती करू लागला. एक दिवस शेखसाहेब समाधी अवस्थेत असताना अकबराला अगदी राहवेना आणि त्याने त्यांना प्रश्न केला, 'मला किती पुत्र होतील?'[३]

असे अनंतकाळपर्यंत तळमळत प्रतीक्षा करत राहण्यापेक्षा एकदाच, 'एकही नाही, कधीच नाही,' हे क्रूर सत्य तरी ऐकावे असे कदाचित त्याला वाटले असावे. किंवा मग तो राजांचाही राजा अकबर असल्यामुळे कदाचित 'मला मुलगा होईल का?' असे विचारण्याऐवजी 'किती होतील?' असे विचारले तर नियतीच्या दोऱ्या आपल्या हाती घेता येतील, असाही विचार त्याच्या मनात असावा.

पण निदान शेखसाहेब अजिबात संदिग्धता न ठेवता उत्तरले, 'ईश्वर तुला तीन पुत्र देईल.'

'असे झाले तर पहिला मुलगा तुमचा असेल. त्याचे रक्षण आणि मार्गदर्शन तुम्हीच करावे.'

शेखसाहेबांनी त्वरित उत्तर दिले, 'त्याचे कल्याण होवो. मी त्याला माझे नाव देतो.'

मग जेव्हा अकबराची वास्तविक अनाम असलेली राजपूत पत्नी, आमेरच्या राजा बिहारीमल कछवाह[४]ची सर्वांत ज्येष्ठ कन्या जोधाबाई (हे तिचे नाव होते हा सार्वत्रिक समज चुकीचा आहे) ऊर्फ मरिअम-उझ-झमानी गरोदर राहिली, तेव्हा अकबराने तिला शेखसाहेबांच्या घरी राहण्यास नेले. तब्बल सात वर्षांपूर्वी अकबराने एका शिकारीहून परतताना शाही पद्धतीने तिच्याशी विवाह केला होता. आता तिला शेखसाहेबांच्या घरी आणण्यामागे राणी आणि तिच्या गर्भातले मूल यांना शेखसाहेबांच्या आशीर्वचनाच्या कवचात ठेवावे हा तर हेतू होताच, पण तिचे गर्भारपण बाजारगप्पांपासून गुप्त राहावे व बादशहाच्या निपुत्रिकपणासंबंधी ज्या कुतूहलपूर्ण कथांचा[५] पूर आला होता तो थोपवावा हाही हेतू होता.

अशा प्रकारे मुघल बादशहाची राजपूत राणी आग्र्याच्या शाही किल्ल्यातून एका सूफी संताच्या डोंगरातील घरामध्ये राहू लागली. अशा या व्यवस्थेमध्ये काही अडचणी येणे साहजिकच होते. त्या वेळच्या काही कुजबुजींमधून असे

सूचित होते की, अचानकपणे-आणि सतत-चिंताक्रांत बादशहा सारखा आपल्या अवतीभोवती दिसू लागल्याने शेखसाहेबांच्या सुना नाखूश होत्या. वैतागलेल्या बायकांमुळे संसारात कटकट सहन करावी लागणारे शेखसाहेबांचे मुलगे आणि पुतणे त्यांच्याकडे तक्रार करायला गेले तेव्हा त्यांना फारसा दिलासा मिळाला नाही. आता खुद्द अकबराची पत्नीच आपल्या जनानखान्यामध्ये राहू लागली म्हटल्यावर बादशहाला तिथे येण्यास मज्जाव शेखसाहेब कसा करू शकले असते? स्वत: अकबरानेदेखील मुलांच्या या तक्रारी हसण्यावारी नेल्या. तो त्यांना म्हणाला, 'जगामध्ये स्त्रियांची कमतरता नाही... स्वत:साठी दुसऱ्या बायका शोधा!'[६]

शिष्टाचाराची बंधने-आणि नियतीची कृष्णकारस्थाने ही-बादशहा आणि त्याचा वारस यांच्यामध्ये येऊ शकत नव्हती. एक दिवस बाळाने पोटात लाथा मारणे थांबवले. प्रथमत: राणीला हे किंचित विचित्र वाटले, काही तरी चुकल्यासारखे वाटले आणि मग जेव्हा तिच्या ध्यानात आले, तेव्हा तिचा मेंदू जणू बधिर झाला आणि ती नखशिखान्त शहारली. तिच्या तोंडून शब्द फुटेना आणि तिने तिच्या दायांना गच्च धरून ठेवले. सलीम लिहितो, 'थरथरत्या मनाने दायांनी ही परिस्थिती बादशहाच्या कानावर घातली.'

अकबर काय करू शकणार होता? त्याने अजमेरची यात्रा करण्याचे वचन दिले होते, त्याने शेखसाहेबांचा आश्रयही घेतला होता, मग आता ही अंतिम परीक्षा कशासाठी? त्याने काही तरी त्याग करायला हवा आहे का, त्याला प्रिय असलेली, त्याला अतिशय आवडणारी गोष्ट सोडून द्यायला हवी आहे का? तसेच असावे कदाचित...

बहुतेक राजेलोकांप्रमाणेच अकबरालाही शिकार मनापासून आवडायची आणि त्यातही त्याचा सर्वांत आवडता, दुर्मिळ आणि नेत्रदीपक शिकारीचा प्रकार म्हणजे पाळलेल्या चित्त्यांच्यासोबत शिकार करणे.[७] माणसाळलेले आणि प्रशिक्षित चित्ते अकबराच्या पशुसंग्रहाचे भूषण होते. शिकारीच्या ताफ्यांतल्या गाड्यांवर ताठ बसून ते चित्ते राजेशाही थाटाने अकबरासोबत फिरत असत. त्यांना मोकळे करताच ते झेप घेऊन आपल्या भक्ष्याच्या मागावर निघत असत आणि दबक्या पावलांनी सावजाच्या अगदी जवळ जाऊन मग झेप किंवा अंतिम झडप घालत असत. त्यांच्या मालकाप्रमाणेच त्यांचा नेम क्वचितच चुकत असे.

मात्र आता त्या शिकारीच्या थराराचा काय उपयोग? आता नवा जीव जन्माला घालण्याची वेळ होती, जीव घेण्याची नव्हे! त्या दिवशी योगायोगाने शुक्रवार होता. अकबराने मग शपथ घेतली की, जर राणीच्या पोटातील बाळ पुन्हा हालचाल करू लागले, तर आयुष्यात पुन्हा कधीही तो शुक्रवारी चित्त्यांसह शिकारीवर जाणार नाही.

आणि तसेच झाले. इ. स. १५६९च्या पावसाळ्यात एका बुधवारी अकबराच्या त्या अनाम राणीने एका मुलाला जन्म दिला. हा मुलगा एक दिवस अकबराच्या सिंहासनावर आरूढ होणार होता. अर्धा मुघल आणि अर्धा राजपूत असलेल्या या मुलाचे नाव ठेवले गेले सलीम–म्हणजे अविच्छिन्न, निर्दोष आणि संपूर्ण.

सलीमच्या जन्माबद्दलचे विविध वृत्तान्त वाचून आपल्याला असे वाटते की, अकबराने केवळ इच्छाशक्तीच्या बळावर हे घडवून आणले. त्याच्या प्रार्थना आणि त्याचे नवस देवाच्या दारावर एखाद्या किल्ल्यावर तोफगोळे आदळावेत तसे आदळत राहिले आणि अखेर त्याची मुलगा होण्याची इच्छा पूर्ण करण्यावाचून देवाला गत्यंतरच उरले नाही. आणि हो, अकबराची इच्छाशक्ती जबरदस्त होती. त्याने त्याचे सर्व नवस पूर्ण केले; मात्र त्याने सलीमच्या जन्मानंतर केलेला निश्चय हा कदाचित त्याचा सर्वांत कठीण निश्चय असावा. बापाने आपल्या नवजात बाळाचे तोंड पाहणे अशुभ असते या सर्वसामान्य श्रद्धेला अनुसरून अकबराने आपली तीव्र इच्छा आणि उत्सुकता दाबून ठेवली आणि तो पुत्रजन्माची खबर मिळताच तातडीने सिक्रीहून अजमेरला गेला नाही.

त्याऐवजी नभभरल्या आकाशात विजेचा लोळ उठावा, तद्वत आग्र्यामध्ये जल्लोष सुरू झाला. एक आनंदी बाप किमान एवढे तरी करणारच! ‘सोन्याच्या लगडीच्या लगडी उधळल्या गेल्या,’ असे एका लेखकाने लिहिले आहे.८ संपूर्ण राज्यातल्या तुरुंगांमधील तळघरांमध्ये खितपत पडलेल्या वैâद्यांची सुटका करण्यात आली. कवी लोक अनेक दिवस राजपुत्राच्या स्तुतिपर कवने रचत होते. त्यातला सर्वांत शैलीदार होता ख्वाजा हुसैन हरावी. त्याच्या काव्याच्या प्रत्येक कडव्यामध्ये पहिल्या ओळीत अकबराच्या राज्यारोहणाची तारीख (फारसी पद्धतीनुसार) आणि दुसऱ्या ओळीत सलीमच्या जन्माची

तारीख होती. (क्रोनोग्राम)[९] उदा. 'बादशहाच्या कीर्तीमागे ईश्वराची कृपा आहे, न्यायाच्या सागरातून एक तेजस्वी मोती किनाऱ्यावर आला आहे.'

'मोती' हे सलीमकरता सर्वांत जास्त वापरण्यात आलेले रूपक होते. इतर अनेक क्रोनोग्राममध्ये, तो 'महासागरातला राजस मोती', 'शहेनशहाच्या राजवाड्याचा मोती', 'अकबर शाहच्या खजिन्यातला मोती' होता. या प्रत्येक वर्णनामध्ये त्याच्या जन्माचे वर्ष प्रकट होते. यात मागे न राहता अबुल फझलने 'अकबरनामा' मधील या उत्कंठापूर्ण प्रकरणाला 'राज्य व भाग्यरूपी राजवाड्यामध्ये जग दिपवून टाकणारा मोती, महत्ता आणि कीर्तीच्या पेटाऱ्यामधला लखलखता हिरा, नामे शहजादा सुलतान सलीम, याचा शुभंकर जन्म' असे शीर्षक दिले.

अकबराची आई हमीदा बानू बेगम हिने नवजात बाळाला तब्बल १९० कॅरेटचे लाल रत्न दिले. हे लाल रत्न अकबराने तो गादीवर असेपर्यंत आपल्या शिरपेचामध्ये मिरवले आणि त्याच्यानंतर सलीमनेही तेच केले. पुढे चालून हे रत्न वारसाहक्काचे जणू प्रतीक आणि अनेक वर्षांनंतर सलीमने म्हटल्याप्रमाणे घराण्याकरता 'भाग्यसूचक' वस्तू ठरले.

अर्थात तिने ते बाळाला दिले त्या वेळी सलीमविना हे घराणेच अस्तित्वात असणार नाही, अशी परिस्थिती होती. बादशहाला फक्त मूल झाले नव्हते, तर मुलगा झाला होता. अकबराने मग 'आनंदोत्सव साजरा करण्याचे आणि अवघ्या जगाला त्याचा अतिथी म्हणून आमंत्रण देत असल्याचे फर्मान काढले,'[१०] यात नवल ते काय? आनंदाचे वर्णन करणारे कुठलेही शब्द या उत्सवापुढे थिटे पडले असते.

शेखसाहेबांची भविष्यवाणी अशा प्रकारे प्रत्यक्षात यायला सुरुवात झाली आणि लवकरच ती पूर्णपणे खरीही ठरली. पुढच्या तीन वर्षांमध्ये सलीमचे धाकटे भाऊ मुराद आणि दानियल यांचादेखील जन्म झाला. अर्थात, सलीमचे झाले, तितक्या पराकोटीच्या आनंदाने या दोघांचे जगामध्ये स्वागत झाले नाही. अबुल फझलने लिहिलेल्या प्रकरणांच्या शीर्षकावरून हे स्पष्ट होते. 'शहजादा शाह मुराद याचा शुभ जन्म,' अशा त्रोटक शब्दांत त्याने एकाच्या जन्माची घोषणा केली, तर सर्वांत धाकट्या दानियलच्या जन्माबद्दल, 'भाग्याच्या वसंतातला फुलांचा छोटा गुच्छ,' असे लिहून त्याची बोळवण केली.

◆

# पुस्तकाच्या पानांतून




## यूज ऑफ फोर्स

**ब्रॅड थॉर**

अनुवाद

**जयंत गुणे**

पृष्ठे : ३८८
किंमत : ७००

*आतंकवाद्यांची पाशवी क्रूरता आणि हार्वथची मानवतावादी निर्भयता यांच्यातील संघर्षाचं थरारक चित्रण*

**बर्निंग मॅन फेस्टिव्हल**
**ब्लॅक रॉक डेझर्ट, नेवाडा**
**दोन दिवसांनंतर**

स्कॉट हार्वथला तिथे पाठवायला नको होतं; कारण सीआयएला (Cenral Inteligence Agency) अमेरिकेच्या अंतर्गत कोणतीही कारवाई करण्याची मनाई होती - जी कामगीरी त्याच्यावर सोपवली होती तशा

प्रकारच्या कामगिरीच्या बाबतीत तर विशेषकरून; पण कठीण वेळ आली तर तसाच कठीण निर्णय घ्यावा लागतो.

'बर्निंग मॅन फेस्टिव्हल' हा वसंत संपतानाच्या सुमारास साजरा केला जाणारा, आठवडाभर चालणारा एक मोठा महोत्सव होता. नेवाडापासून तीन तास अंतरावरच्या रेनो या गावी एका प्राचीन तलावाच्या कोरड्या पडलेल्या सपाट पात्रात त्या महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं होतं. त्यात सहभागी झालेल्यांनी काहीतरी चित्रविचित्र वेशभूषा करून यावं, अशी अपेक्षा असायची. वेशभूषेत मॅड मॅक्स ते रिओ कार्निव्हल असं काहीही चालत असे. त्यात नग्नतेलासुद्धा मनाई नव्हती; फक्त ती शोभून दिसली पाहिजे, ओंगळवाणी दिसता कामा नये एवढीच अट होती.

स्कॉट हार्वथचा विचार केला तर त्याने काहीही कपडे केले नसते तरी चालणार होतं; पण ते त्याच्या स्वभावात बसलं नसतं. शिवाय त्याच्यावर जी कामगिरी सोपवली होती त्याला ते विसंगत दिसलं असतं.

त्यामुळे पाच फूट दहा इंच उंचीच्या, भुरे केस आणि हिमनदीसारख्या निळ्याशार डोळ्यांच्या हार्वथने कॉन्टिनेन्टल आर्मीचा गणवेश घालणं पसंत केलं होतं. फक्त त्याने आपल्या चेहऱ्यावर लावलेल्या चेरोकी वॉर पेन्टमुळे त्याचा मूळचा देखणा चेहरा ओळखू येत नव्हता.

वारा पुन्हा जोरदार वाहू लागल्यामुळे त्याने डोळ्यांवर गॉगल लावला आणि अरब लोक घालतात तसा काफिया त्याने डोक्याभोवती गुंडाळला. वाळवंटातील सूक्ष्म धूलीकणांनी भरलेली वावटळ चहूकडे थैमान घालत फिरत होती. त्यामुळे अंधारून आल्यासारखं वाटत होतं.

''पन्नास मीटर,'' त्याने डाव्या कानाला लावलेल्या उपकरणातून आवाज आला. तो चौफेर बघत चालला होता.

बर्निंग मॅन फेस्टिव्हलसाठी ब्लॅक रॉक डेझर्टमध्ये ब्लॅक रॉक सिटी (बीआरसी) नामक एक तात्पुरती वसाहत वसवली होते. जवळपास सत्तर एक हजार लोकांसाठी उभारलेली ही तात्पुरत्या वस्तीची घनता मध्य लंडनच्या लोकवस्तीच्या घनतेपेक्षा दुप्पट होती.

वरून पाहिलं असतं तर ही वस्ती इंग्रजी 'C' अक्षरासारखी, वर्तुळाच्या परिघाच्या दोन तृतीयांश भागापर्यंत पसरलेली दिसली असती. मध्यभागी माणसाच्या आकाराचा एक भव्य पुतळा केला होता आणि त्या पुतळ्याचं शनिवारी रात्री दहन करण्यात येणार होतं.

ब्लॅक रॉक सिटीमध्ये निवासासाठी कोणतीही व्यवस्था केलेली नव्हती. प्रत्येकाने आपापल्या निवासाची सोय तंबू, कॅराव्हान व्हॅन आपल्याबरोबर आणायची होती आणि जाताना परत घेऊन जायची होती. अभ्यागतांनी आपला निवास, तेथील कॅम्प, तेथे उभारलेली खेडी वगैरेंची कित्येक महिन्यांपासून मोठी तयारी केली होती. पहिल्या दिवशी अतिश्रीमंत लोक आपापल्या हॅलिकॉप्टरमधून आले. त्यांच्या सुखसोयींची जंगी तयारी अगोदरपासून केलेली होती.

अतिश्रीमंत लोकांसाठी उभारलेल्या कॅम्पइतकाच मुलांसाठी उभारलेला किड्सव्हिलाही लोकांच्या चर्चेचा विषय झाला होता. बर्निंग मॅनमधील मुले आणि कुटुंबीयांसाठी तो एक मोठा कॅम्प होता. मुख्यत: प्रौढांसाठी असलेल्या उत्सवातील ते एक आश्चर्य म्हटलं पाहिजे. कसंही असलं तरी या वर्षी हजार एक मुलं उपस्थित होती.

खासगी सुरक्षा दलांच्या मदतीला स्वयंसेवकही होते. त्यांनी कॅम्पमध्ये आलेल्या प्रत्येक वाहनाची कसून तपासणी केलेली होती. अधूनमधून स्थानिक पोलिसांचे गुप्तचरही त्यांच्या मदतीला होते.

आत येणाऱ्या वाहनांची प्रचंड गर्दी, जोडीला उत्सवी वातावरण. त्यामुळे कोणतीही गोष्ट नीटपणे करणं शक्य होत नव्हतं. त्यामुळे जी काही व्यवस्था होती त्यात सुरक्षेऐवजी सुरक्षेचं नाटक जास्त चाललं होतं.

स्थानिक तसेच राज्य पातळीवरील संरक्षक दलांची गस्त चालू होती. जोडीला ब्यूरो ऑफ लॅन्ड मॅनेजमेन्टचे पार्क रेंजर्स होते; पण जोपर्यंत तुम्ही खुले आम अमली पदार्थ विकत नाही किंवा अल्पवयीन मुलांना दारू पुरवत नाही, तोपर्यंत तुमच्याकडे कोणाचं लक्ष गेलं नसतं. सुरक्षाव्यवस्था यात एवढ्या गुंतल्या होत्या की त्यामुळेच दहशतवाद्यांचं लक्ष बर्निंग मॅन फेस्टिव्हलकडे वळलं यात काही नवल नव्हतं. हार्वथच्या कानात आवाज आला, ''आता तुम्हाला काहीतरी दिसेल.''

तो चालायचा क्षणभर थांबला, हातातील पाण्याची बाटली वर करून तोंडा-जवळ नेली आणि त्या संधीचा वापर करून चौफेर नजर टाकली.

जागोजागी लटकवलेले कापडी फलक आणि तंबूंच्या दारावरील कनाती वाऱ्याने फडफडत होते. जवळच 'सेव्हन डेडली जिन्स' या नावाचा तात्पुरता उभारलेला एक बार होता, कॅम्प वू वू नावाचं काहीतरी होतं, नो बिकिनी ॲटॉल नामक एक तंबू होता आणि टॉक्सिक डिस्को क्लॅम असं नाव दिलेली एक टपरी होती. जवळच एक निळ्या रंगाची रीक्रिएशन व्हेईकल (आरव्ही) व्हॅन उभी

केलेली होती.

''मला दिसली,'' हातातील पाण्याची बाटली फेकून देऊन हार्वथ म्हणाला.

''हे!'' त्याच्या मागची एक बाई तक्रारीच्या सुरात ओरडली; पण त्याने तिच्याकडे दुर्लक्ष केलं आणि तो पुढे चालू लागला. हमझा रहीमच्या शोधात तो इतक्या दूरवर येऊन पोचला होता की त्याला आता हातचा जाऊ देण्यात मतलब नव्हता.

धुळीच्या जोडीला संध्याकाळी पेटवलेल्या शेकोटीच्या धुराने वातावरण भरून गेलं होतं. चहू बाजूंनी कानठळ्या बसवणारं संगीत ऐकू येत होतं. साउंड सिस्टिम्स आणि रात्रीच्या लाइट शोजना लागणारा विद्युतपुरवठा करणाऱ्या डिझेल जनरेटरची मंद आवाजातील घरघर त्या कोलाहलाला पार्श्वसंगीत देत होती. नर्तकांचे बेधुंद नृत्य, दोरीवरील कसरती आणि रात्रीच्या वेळेला आकाशात फटाक्यांची चाललेली आतषबाजी यामुळे उत्सवी वातावरणातील बेहोशी जाणवत होती.

निळ्या रंगाची आरव्ही जिथे उभी करून ठेवलेली होती त्या कॅम्पभोवती त्याने सावकाश एक फेरी मारली. बाहेरील धुळीच्या वादळात थांबण्यापेक्षा सगळ्या जणांनी तंबूच्या आत चालणाऱ्या पार्टीत सामील होणं पसंत केलं होतं.

एलईडी लाइटच्या माळा लावलेले काही सायकलस्वार निघून गेल्यावर हार्वथ आरव्हीकडे गेला.

बाहेर अंधार होता. त्याने खिडकीच्या काचांमधून आत बघण्याचा प्रयत्न केला; पण खिडक्यांवर पडदा लावलेला होता आणि पुढच्या काचेवर सनशिल्ड लावलेली होती.

त्याने दरवाज्याला कान लावला. आतून कोणताही आवाज येत नव्हता. आतमध्ये कोणी असलाच तर तो अगदी शांत बसला असला पाहिजे.

त्याने दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केला; पण त्याला कुलूप होतं.

त्याने त्याची आयुधं काढली आणि आजूबाजूला नजर टाकून कोणी पाहत नाही याची खात्री केली. कोणाचंही लक्ष नव्हतं. काही क्षणांत दरवाज्याचं कुलूप उघडलं. त्याने आपल्या सिग सॉयर पिस्तुलाला सप्रेसर बसवला आणि तो हळूच आत शिरला.

डोक्याभोवती गुंडाळलेल्या काफियाने नाक झाकलेलं असूनही आतील दुर्गंधीचा भपकारा त्याच्या नाकात शिरला. सिगारेटची थोटकं, नीट साफ न केलेलं शौचालय. त्याने गॉगल काढला. काही सेकंदाने आतील अंधाराला त्याचे डोळे सरावले.

टेबलावर अर्धवट खाऊन टाकलेलं अन्न तसंच उघडं पडलेलं होतं. सिंकमध्ये धुवायच्या प्लेट्सचा ढीग रचून ठेवलेला होता. कचऱ्याची बॅग भरून ओसंडून वाहत होती. तिचं एक टोक ड्रॉवरच्या हॅन्डलला बांधून ठेवलं होतं. अपहोल्स्लरी (खुर्ची इ. च्या उश्या बनविण्याचं साहित्य) फाटलेली होती, कार्पेटवर डाग पडले होते आणि सगळ्या सामानावर धुळीचा दाट थर साचलेला होता. हमझा रहीम एखाद्या जनावरासारखा राहत असला पाहिजे.

जमिनीवर काहीतरी पडलेलं पाहून हार्वथ ते उचलण्यासाठी खाली वाकला. तो एक इलेक्ट्रिक वायरचा तुकडा होता. तो बघून त्याच्या काळजाचा ठोका चुकला.

सीआयएच्या माहितीप्रमाणे रहीमला बर्निंग मॅन फेस्टिव्हलमध्ये चाचपणी करण्यासाठी पाठवलं होतं. त्याचं काम फक्त टेहळणी करणं आणि मिळालेली माहिती आपल्या वरिष्ठांकडे पाठवून देणं एवढंच होतं. हार्वथवर कसंही करून रहीमला पकडून त्याचं नेटवर्क उद्ध्वस्त करणे ही कामगिरी सोपवली होती. मिळालेल्या इलेक्ट्रिक वायरच्या तुकड्यामुळे सीआयएला मिळालेली माहिती भयंकर दिशाभूल करणारी असल्याची शक्यता होती. दोन्ही हातांत पिस्तूल घेऊन हार्वथ सावधपणे वाहनाच्या पाठच्या भागाकडे सरकला.

सर्वप्रथम त्याने एक छोटी पेटी तपासून पाहिली. त्यात सगळं भंगार सामान भरलेलं होतं. त्याच्यासमोर एक बंक बेडची जोडी होती. दोन्ही बिछान्यांत कोणीतरी झोपल्याची खूण होती. एक वाईट खूण. रहीम एकटाच असणं अपेक्षित होतं.

बंक बेडच्या पलीकडे मास्टर एरिया होता. त्याही बेडवरही कोणीतरी झोपल्याची खूण दिसत होती. फक्त एकच जागा आता शोधायची बाकी होती. बाथरूम.

दरवाजा बंद होता. बाजूला सुरक्षित आडोसा घेऊन त्याने दरवाज्याची मूठ हळूच फिरवली. दरवाजा आतून बंद होता.

त्याने बाथरूममधून काही आवाज येतो का याची चाहूल घेतली; पण बाहेर वाजणाऱ्या संगीताचा ढणढणाट सोडला तर कोणताही आवाज ऐकू येत नव्हता.

दरवाज्याच्या समोर येऊन त्याने आपल्या बुटाची एकच लाथ कुलपाच्या मुठीवर हाणली. कुलूप तुटून तिथे भोक दिसू लागलं.

दरवाज्याची बिजागरी बाहेरच्या बाजूने उघडणारी होती. हार्वथने पिस्तुलावरचा एक हात काढला आणि दरवाज्याला हात घातला. त्याचवेळी एक स्फोट झाला.

## २

मध्य-पूर्वेतील माणसांसारख्या दिसणाऱ्या एका इसमाने बाथरूमचा दरवाजा धाड्कन उघडला आणि हातातील प्लॅस्टिकच्या मगमधील द्रव्य हार्वथ जिथे उभा असावा असं त्याला वाटलं त्या दिशेने फेकलं.

बाथरूमचा ड्रेन क्लीनर आणि ब्लिचिंग सोल्यूशनचं ते मिश्रण होतं. हार्वथ थोडक्यात वाचला आणि ते द्रव्य पाठची भिंत आणि डावीकडच्या खिडकीच्या पडद्यावर जाऊन पडलं.

आपल्या हातातील पिस्तुलाचा दस्ता त्याच्या नाकावर हाणून हार्वथने त्या हल्ल्याला प्रत्युत्तर दिलं.

त्या आघातामुळे त्याचा प्रतिस्पर्धी गुडघ्यात लडखडला आणि खाली पडू लागला. तेवढ्यात हार्वथने त्याच्या मागे जाऊन त्याच्या मानगुटीला आपल्या डाव्या हाताचा विळखा घातला आणि त्याला विचारलं,

''हमझा रहीम कुठे आहे?''

ज्या माणसाने हार्वथला खिडकीतून डोकावताना पाहिलं होतं किंवा व्हॅनमध्ये येताना त्याची चाहूल लागली होती त्याने आपलं डोकं नकारार्थी हलवलं.

हार्वथने या खेपेला त्याच्या डोक्यावर एक दणका दिला.

''कुठे आहे तो? रहीम कुठे आहे?''

हल्लेखोराचा प्रतिकार चालूच होता. म्हणून हार्वथने पिस्तूल त्याच्या पायाच्या दिशेने रोखलं आणि चाप ओढला.

त्याच्या तोंडून फुटलेली किंकाळी एवढी जोरदार होती की कोणाचं लक्ष वेधलं जाऊ नये म्हणून हार्वथला त्याचं तोंड दाबून धरावं लागलं.

''रहीम कुठे आहे ते मला सांग, नाहीतर मला दुसऱ्या पायावर गोळी झाडावी लागेल.''

त्या माणसाने हार्वथसमोर हात जोडले. त्याने तसं करताच त्याच्या डाव्या हाताला दोन बोटं नसल्याचं त्याच्या लक्षात आलं. हार्वथच्या मनातील शंका खरी ठरली. हा इसम बॉम्बमेकर असला पाहिजे.

हार्वथच्या मनात आणखी काही शंका होत्या; पण त्या माणसाने केलेल्या बाथरूम ब्लीच बॉम्बच्या स्फोटातील विषारी वायूमुळे त्याचं नाक, डोळे आणि घसा यांची जळजळ होत होती. त्यांना ताबडतोब त्या व्हॅनमधून बाहेर पडणं आवश्यक होतं. ते अर्ध्या रस्त्यात असतानाच दरवाज्यात कोणीतरी आलं.

त्या इसमाची आकृती एखाद्या पायघोळ अंगरखा घातलेल्या पाद्र्यासारखी

दिसत होती. त्याने चेहऱ्यावर क्रोमचा चकाकणारा मुखवटा चढवला होता. त्या आकृतीच्या हाती शस्त्रही होतं आणि हार्वथने काही करण्याच्या आतच त्याने गोळीबार करायला सुरवात केली.

आडोसा मिळेपर्यंत हार्वथने बॉम्बमेकरचा वापर ढालीसारखा करत आपला बचाव केला आणि हातातला मुडदा बाजूला ढकलत आडोसा घेतला. क्रोमचा मुखवटा घातलेल्या हल्लेखोराच्या पिस्तुलातील गोळ्या संपेपर्यंत व्हॅनच्या पत्र्याला भोकं पाडत राहिल्या.

हार्वथला उलट गोळीबार करायचा होता; पण त्या विषारी वायूमुळे त्याला श्वासही घेता येत नव्हता.

पाठीमागच्या खिडकीच्या काचेवर गोळ्या मारून त्याने ती काच फोडली आणि बाहेरच्या जमिनीवर उडी मारली.

व्हॅनखालची जागा आसरा घेण्यासाठी सुरक्षित आहे हे त्याला त्याच्या अंत:प्रेरणेनुसार कळत होतं; पण त्याचवेळी क्लोरीन वायू हा हवेपेक्षा जड असतो आणि अजूनही त्या मिश्रणातून त्याची गळती होत असेल तर तो व्हॅनच्या खाली साचला असण्याची शक्यता होती. त्यामुळे त्याला त्या आरव्ही व्हॅनपासून शक्य तितक्या लवकर दूर जाण्याची नितांत जरूरी होती.

व्हॅनच्या पुढच्या भागावर आपल्या सिग सॉयूर पिस्तुलातून गोळ्यांचा वर्षाव करत त्याने जमिनीवर लोळण घेतली आणि जवळच्या पिक-अप ट्रकच्या मागे जाऊन आडोसा घेतला. उडालेल्या धुळीच्या लोटात त्याच्या हालचाली कोणाला दिसल्या नाहीत.

ट्रकच्या मागे आल्यावर त्याने आपला गॉगल पुन्हा डोळ्यांवर चढवला, काफिया घट्ट केला आणि श्वास घेतला. त्याच्या फुप्फुसात अजूनही जळजळ होत होती. त्यात थकवा आणि धुळीचा भाग किती आणि क्लोरीनचा किती ते त्याला कळणं कठीण होतं. आपल्या छातीत भयंकर आग होत आहे एवढंच त्याला कळत होतं.

''रहीम एकटा नाहीय,'' हार्वथ त्याच्या रेडिओ फोनमध्ये खोकतखोकत म्हणाला. ''त्या ट्रेलरमध्ये आणखी कोणीतरी होतं.''

''कोण?''

''बॉम्बमेकर. ते इथे नुसती पाहणी करायला आलेले नाहीत. त्यांना हल्ला करायचाय.''

''जीझस! तुम्हाला ते मिळाले का?''

''बॉम्बमेकर मेलाय.'' हार्वथ म्हणाला. ''पण रहीम पळालाय. त्याने पाद्री लोक घालतात तसा तपकिरी रंगाचा अंगरखा आणि वर क्रोम रंगाचा मुखवटा घातलाय. ताबडतोब ड्रोन चालू करा.''

''या वादळात ते टिकणार नाही.''

''टिकलं नाही तरी हरकत नाही; पण ताबडतोब चालू करा.''

''रॉजर दॅट. ठीक आहे.''

हार्वथने आपल्या पिस्तुलात एक नवीन मॅगझीन भरलं आणि ट्रकच्या आडोशा- मागून बाहेर येताना सूचना दिल्या, ''एक्स्ट्रॅक्शन टीमला दोन गटांत पाठवा. आपल्याला काहीही करून रहीमला गाठायलाच हवं.''

''कधी सुरवात करायची?''

''ताबडतोब.''

हार्वथने रेडिओवरील संभाषण थांबवलं आणि पुढील हालचालींना सुरुवात केली.

माईक हेनी हुशार होता. सीआयएने त्याला दोन वर्षांपूर्वी हेरलं होतं. स्पेशल ऑपरेशन ग्रूपमध्ये रुजू होण्याआधी तो फोर्स रेकॉन मरीनमध्ये काम करीत होता. तो भरवशाचा आहे याबद्दल हार्वथची खात्री होती.

एक्स्ट्रॅक्शन टीममध्ये सैन्यात काम केलेले चार अनुभवी अधिकारी होते. नेव्ही सील (Navy SEAL) मधला टिम बार्टन, डेल्टा फोर्स ऑपरेशनमधला टायलर स्टेलिन, माजी ग्रीन बॅरेट जॅक गेज आणि हेनीप्रमाणे फोर्स रेकॉन मरीनमधून आलेला मॅट मॉरिसन.

ज्या एका मोठ्या बसमध्ये एक्स्ट्रॅक्शन टीमच्या कारवाईचा तळ असायचा ती बस चालवण्यापासून सर्व कामांची जबाबदारी हेनी सांभाळत असे. एक्स्ट्रॅक्शन टीमसाठी बनवलेली एक सहा जणांची मॉडिफाइड गोल्फ कार्ट थोड्या अंतरावर उभी करून ठेवलेली होती.

ब्लॅक रॉक सिटीमधील रचना जरी फक्त पादचारी आणि सायकली यांच्यासाठी केलेली असली तरी त्यांनी त्यांच्या टीममधील एक जण अपंग आहे, असं शिफारसपत्र जोडून आपल्या गोल्फ कार्टला सिटीमध्ये प्रवेश मिळवला होता.

मागच्या सीटच्या मागे स्टोरेजसाठी जी जागा होती त्यात रहीमला लपवून बाहेर काढता आलं असतं. एका छुप्या कप्प्यात त्यांची लपवलेली शस्त्रं होती.

येताना वाटेत घेतलेला स्प्रे पेन्ट मारून आणि ख्रिसमसच्या दिव्यांच्या

माळा लावून त्यांनी गाडी सजवण्याचा त्यांच्या परीने चांगला प्रयत्न केला होता. कोणाला ती अगदी घाणेरडी वाटली असली तरी त्यांना त्याची पर्वा नव्हती, कसंही करून काम फत्ते झाल्याशी कारण.

रहीम फार दूर गेला नसावा. हार्वथने पिस्तुलाला बसवलेला सप्रेसर काढला, पिस्तूल कोटाच्या खिशात ठेवलं आणि प्रत्येक तंबूत डोकावून पाहायला सुरुवात केली.

एका तंबूत 'देवाशी बोला' असा फलक लावून काही टेलिफोन ठेवले होते. तिथे तर त्याने रहीमच्या वेशाचं वर्णन करून अशा वेशातल्या माणसाला कोणी पाहिलंय का याची जाहीर विचारपूस केली.

मोटरसायकलचं शिरस्त्राण घातलेल्या एका बाईने होय म्हणून सांगितलं आणि डाव्या दिशेला बोट दाखवलं. हार्वथने तिचे आभार मानून चट्कन त्या दिशेने कूच केलं.

ब्लॅक रॉक सिटीमध्ये धुळीचे ढग अजूनही घोंगावत होते; पण दृश्यमानता थोडी बरी होती. हार्वथने आपली पोझिशन हेनीला सांगितली आणि एक्सट्रॅक्शन टीमच्या लोकांना त्या ठिकाणाला घेराव घालाण्याच्या सूचना दिल्या. सूचना देऊन होतात तोच त्याला पायघोळ अंगरखा आणि क्रोमचा मुखवटा घातलेल्या व्यक्तीची आकृती दिसली.

जलद पावलं उचलत त्याने त्यांच्यामधील अंतर झपाट्याने कापलं. तो इसम उभ्या केलेल्या वाहनांमधून, जागोजागी ठेवलेल्या सामानाच्या ढिगातून वाट काढत, एका कॅम्पमधून दुसऱ्या कॅम्पमध्ये डोकावून बघत चालला होता. आपल्याकडे कोणाचंही लक्ष जाऊ नये याची तो चांगलीच दक्षता घेत होता. त्याने निश्चितच कोणाकडून तरी चांगली तयारी करून घेतली असावी.

''हेनी, आपलं ड्रोन येणार होतं ते कुठेय?'' चालताचालता हार्वथचा पाय पाण्याच्या रिकाम्या बाटल्यांवर पडला आणि त्याने विचारलं.

''वाटेवर आहे. तीस सेकंदांत येईल.''

''अरे, हा इसम तीस सेकंदांत गायब होईल. घाई करा.''

''सापडला.'' हार्वथच्या इअरफोनमध्ये कोणीतरी बोललं. त्याने तो आवाज ओळखला. तो डेल्टा फोर्समधून आलेला स्टॅलीन होता. आता त्याच्या जोडीला नेव्ही सीलचा बार्टन होता.

''तू कुठे आहेस?''

स्टॅलीनने त्याची पोझिशन सांगितली.

''अजून दोन ब्लॉक दूर आहेस,'' हार्वथने उत्तर दिलं. ''तू चुकीच्या माणसाच्या मागे आहेस.''

''बुलशीट. मी बरोबर तपकिरी रंगाच्या वेशातील आणि क्रोमचा मुखवटा घातलेल्या माणसाच्या मागे आहे.''

**३**

''त्याच्यावर नजर ठेव,'' हार्वथने आदेश दिला. त्यांचा काय बेत असावा ते त्याला कळत नव्हतं, एवढंच नव्हे तर या क्षणी ते नक्की कोणाचा पाठलाग करत आहेत, तेही त्याला माहीत नव्हतं; ''पण त्याला तू दिसणार नाहीस याची खबरदारी घे.''

''रॉजर दॅट, ठीक आहे.'' स्टेलिन म्हणाला.

''हेनी-'' हार्वथ काहीतरी बोलत होता; पण तेवढ्यात त्याला थांबवलं गेलं.

''त्याच्या डोक्यावर आपलं ड्रोन आलंय.''

चालताचालता त्याने कोटाच्या खिशातून एक छोटा इन्फ्रारेड टॉर्च काढला आणि क्लिपने लॅपेलला लावला. ''मी दिसतोय तुला?''

''असशील तिथेच उभा राहा.'' हेनी ड्रोनवर बसवलेल्या इन्फ्रारेड कॅमेऱ्याने हार्वथने कोटाच्या लॅपेलवर लावलेला स्ट्रोब पकडण्याचा प्रयत्न करत होता. स्ट्रोब कॅमेऱ्यात दिसायला लागल्यावर हेनीने रेडिओवर उत्तर दिलं, ''तू आता दिसतोयस.''

''माझ्यासमोर एक अंगरखा घातलेला इसम चाललाय,'' हार्वथ म्हणाला. ''नोकरीच्या मुलाखतीला उशीर होऊ नये म्हणून घाई करत असावा तसा चाललाय. दिसला का?''

उत्तर देण्यापूर्वी हेनी थोडा थांबला. ''नाही. मला काहीच दिसत नाहीय.''

''म्हणजे तुला नक्की काय म्हणायचंय?''

''मला तो दिसत नाहीय, म्हणजे ड्रोनमध्ये त्याला पकडता येत नाहीय.''

तेवढ्यात आणखी एक आवाज ऐकू आला. ग्रीन बॅरेटच्या गेजबरोबर असलेल्या मरीन कमांडो मॉरिसनचा तो आवाज होता. ''मी त्याच्यावर नजर ठेवून आहे.''

''तू कुठे आहेस?'' हार्वथने विचारलं.

मॉरिसनने त्याचं लोकेशन सांगितल्यावर हेनी म्हणाला, ''तू, हार्वथ किंवा स्टॅलीनपासून खूप लांब आहेस. तुम्ही तीन वेगवेगळ्या माणसांचा पाठलाग करत आहात.''

शिट, किती माणसं यात आहेत? हार्वथ कोड्यात पडला.

''एव्हरीबडी, स्ट्रोब्स ऑन.'' त्याने आदेश दिला.

सर्वांनी आपापली  इन्फ्रारेड उपकरणं चालू केली आणि रेडिओवर रॉजर दॅट ... ''ठीक आहे, स्ट्रोब्स ऑन'' असा कोरस ऐकू आला.

सापडलेले वायरचे तुकडे आणि बॉम्बमेकरची उपस्थिती यातून काहीतरी भयंकर घडत असणार अशी शंकेची पाल चुकचुकली; पण जे काही घडणार असेल ते आज रात्री असेल का? कदाचित आज नुसती पाहणी करत असतील आणि उद्या किंवा परवा रात्री जेव्हा महोत्सवात जास्तीतजास्त लोक येणार असतील तेव्हा धमाका उडवून द्यायचं कारस्थान असेल. काही भाकित करणं कठीण होतं. त्याला फक्त त्या तिघांपैकी एकाकडे शस्त्र आहे हे नक्की ठाऊक होतं. आणि ज्याअर्थी एक जण सशस्त्र आहे त्याअर्थी उरलेले दोघंही सशस्त्र असण्याचीच शक्यता होती.

हार्वथने हेनीला त्या दोघांच्या पोझिशन नकाशावर नक्की करण्याची सूचना रेडिओ फोनवरून दिली. त्याने मनातल्या मनात ब्लॅक रॉक सिटीचा नकाशा डोळ्यांसमोर आणण्याचा प्रयत्न केला. ते सर्व कोणत्या दिशेने चालेलयत. सगळ्यात महत्त्वाचं ... रहीमचे आणखी कोणी साथीदार आहेत का?

त्याच्या मनात एक मोठा प्रश्न घोळत होता. त्याने जे केलं त्याने त्यांच्या योजनेत खोडा घातला होता का? ती माणसं बॉम्ब ठेवत होती का? की त्यांचा बॉम्ब अगोदरच ठेवून झाला असावा. किंवा त्यांच्या मनात काही अगदी वेगळीच योजना असेल?

हेनीचा आवाज त्याच्या इअरफोनमध्ये आला. ती काही चांगली बातमी नव्हती. ''मला कोणी दिसत नाहीय.''

''हवा खराब असल्यामुळे असं झालं असेल का?'' हार्वथने विचारलं खरं; पण तसं काही कारण नसावं असं त्याला आतून वाटत होतं.

''तसं नाही. त्यांनी जे काही कपडे घातले आहेत त्यातून त्यांच्या शरीराची उष्णता बाहेर पडत नाहीय, त्यामुळे आपला इन्फ्रारेड कॅमेरा त्यांच्या हालचाली टिपू शकत नाही.''

डॅम इट. काहीतरी चलाखी आहे. या लोकांना इन्फ्रारेडचा माग कसा लपवायचा ते चांगलं ठाऊक आहेसं दिसतंय. हार्वथला वाटणारी भीती खरी ठरली.

''ते ज्या दिशेने चाललेत त्यावरून त्यांच लक्ष्य कोणतं असावं असं वाटतंय?'' त्याने विचारलं, ''काही अंदाज करता येतोय का?''

हेनीने महोत्सव नगरीच्या नकाशाचा थोडा अभ्यास केला. ‘‘काहीही शक्य आहे.’’

‘‘त्यांच्यासारखा विचार कर.’’

‘‘मी त्यांच्यासारखाच विचार करतोय,’’ हेनीने उत्तर दिलं. ‘‘इथल्या प्रत्येक कॅम्पचा विषय कोणत्या ना कोणत्यातरी प्रतीकावर बेतलेला आहे.’’

स्टॅलीनच्या आवाजाने त्यांच्या बोलण्यात खंड पडला.

‘‘आपला माणूस थोडा मागे फिरला आणि एकदम डावीकडे वळला. आता तो पश्चिम दिशेने चाललाय.’’

काही क्षणांत मॉरिसन म्हणाला, ‘‘आपल्या माणसाने दोन तंबूंतून एक शॉर्टकट घेतला आणि आता तो पूर्व दिशेला चाललाय.’’

हार्वथ ज्याचा पाठलाग करत होता तो एकदम थांबला. आपण कुठे आहोत याचा अंदाज घेऊन त्याने उत्तर दिशेने चालायला सुरवात केली. ते सगळे आपली दिशा बदलत होते.

‘‘माईक, ते कुठे चाललेत?’’ हार्वथने त्याचा पाठलाग चालू असतानाच विचारलं.

‘‘कम ऑन. आपल्याला शोधून काढलंच पाहिजे.’’

‘‘मी तुम्हाला केव्हापासून सांगतोय,’’ हेनीने उत्तर दिलं, ‘‘त्यांचं लक्ष्य कुठलंही असू शकेल.’’

तेवढ्यात मॉरिसन मध्ये बोलला.

‘‘माझ्या माणसाचं लक्ष्य काय असावं त्याचा मला अंदाज आलाय. त्याला आता घेतला पाहिजे.’’

‘‘जरा धीराने घे.’’ हार्वथने सावधगिरीची सूचना दिली. ‘‘तो कुठे चाललाय?’’

‘‘किड्सव्हिला. फॅमिली कॅम्प.’’

परिस्थितीचं गांभीर्य वाढलं. त्यांना ताबडतोबीने काहीतरी कृती करण्याची गरज होती.

दुसऱ्या एका कॅम्पमधून जाताना हार्वथला तंबूच्या खांबावर अडकवलेला एक गम टेपचा रोल दिसला. तो रोल उचलून तो पुढे चालू लागला.

‘‘अंगावरच्या कपड्यांत लपवलेल्या बटनावर हात ठेवून चालत आहे, असा कोणी दिसतोय का?’’ त्याने विचारलं.

आत्मघाती बॉम्बर अंगावर घातलेल्या कपड्यांत लपवलेल्या एका बटनावर

सतत हात ठेवून वावरत. स्फोटकांशी जोडलेलं ते बटन 'डेड मॅन स्विच' या नावाने ओळखलं जात असे. नियोजित स्थळी पोहोचताच ते बटन दाबलं की तत्क्षणी बॉम्बचा स्फोट होई. जर दहशतवाद्याला मध्येच गोळी लागली किंवा तो जायबंदी झाला तर केव्हाही ते बटन दाबून तो बॉम्बचा धमाका उडवू शके.

चिकन स्विच नामक आणखीन एक प्रकार असे. तो दहशतवाद्याच्या व्हेस्टला सेल फोनच्या साहाय्याने जोडलेला असे. जर कोणत्याही कारणाने नियोजित जागी किंवा नियोजित वेळी बॉम्बचा स्फोट होऊ शकला नाही तर दुरून रिमोट कन्ट्रोलने बॉम्बचा स्फोट करणे शक्य होई.

इथे या दोन्ही तंत्रांपैकी एक किंवा खरंतर दोन्ही तंत्रं वापरली असण्याची शक्यता होती. त्यामुळे परिस्थितीच्या गांभीर्यात अधिक भर पडत होती.

''नाही.'' स्टॅलीनने उत्तर दिलं. ''माझ्या माणसाचे दोन्ही हात त्याच्या डगल्यात लपवलेले आहेत.''

''माझ्या माणसाचेसुद्धा.'' मॉरिसन म्हणाला.

हार्वथलासुद्धा तो ज्याच्या मागे होता त्या माणसाचे हात जेव्हा त्याने त्याच्यावर पिस्तूल रोखले होते, तो क्षणार्ध सोडला तर नंतर कधीच दिसले नव्हते.

हार्वथवर सोपवलेल्या कामात एकाच वेळी अनेक आत्मघाती बॉम्बरशी सामना करण्याच्या कामाचा समावेश नव्हता. त्याचं काम होतं दहशतवाद्यांच्या सूत्रधाराची टेहळणी करणं, त्याचा पाठलाग करणं, त्याला पकडणं, त्याला ब्लॅक रॉक सिटीमधून बाहेर काढणं आणि नंतर पुढील चौकशीसाठी एका पूर्वनियोजित गुप्त ठिकाणी घेऊन जाणं. दहशतवाद्याची उचलबांगडी करणं ही त्याची मुख्य जबाबदारी होती. बाकीच्या कामात त्याच्या मदतीसाठी सहायक होते.

हार्वथला आपले सहकारी कोण आहेत, कोठून आले आहेत याची फारशी माहिती नव्हती; पण ते भरवशाचे आहेत याची त्याला पक्की खात्री होती आणि त्यांनी आपल्या कृतीने त्याचा विश्वास सार्थ ठरवला.

''पुन्हा एकदा विचार करा.'' हार्वथ रेडिओवरून सूचना देत होता. ''ज्यांना यात पुढे यायचं नसेल त्यांनी वेळीच मागे व्हा. अजून वेळ आहे.''

''मुळीच नाही.'' सर्वांनी एका सुरात ठामपणे सांगितलं.

हार्वथने त्याची योजना आखली.

''धरून चला की त्या सगळ्यांकडे शस्त्रं आहेत, सगळ्यांनी स्फोटकं लावलेली व्हेस्ट घातली असतील, आणि एक हात त्या बटनावर दाबून ठेवला असेल. सगळा खेळ खल्लास. म्हणून सांगतो, जेव्हा कारवाईला सुरवात कराल

तेव्हा तुमचं सारं अवधान आपापल्या लक्ष्यावर केंद्रित करा; पण एक डोळा सतत त्याच्या हातावर असू द्या. कळलं?''

''रॉजर दॅट, ठीक आहे.'' सर्वांनी एकाच वेळी उत्तर दिलं.

हेनीला ठाऊक होतं की हार्वथ कोणत्याही साथीदाराशिवाय काम करतोय. याचा अर्थ त्याचं काम सर्वांत कठीण होतं. दहशतवाद्याचा हात निकामी करण्यात त्याला कोणाचीही मदत होणार नव्हती.

''मी पाच मिनिटांत तुझ्या मदतीला येतो.'' हेनीने आपण होऊन मदत देऊ केली.

हार्वथने तो पाठलाग करीत असलेला इसम कुठे चालला आहे ते एका दृष्टिक्षेपात पाहून घेतलं. तो क्रिस्टल स्काय नावाचा सर्वांत मोठा कॅम्प होता. तिथे बड्या सभासदांची गर्दी झाली होती.

तिथे आलेले बहुतेक जण सिलिकॉन व्हॅलीतील उच्चाधिकारी आणि प्रचंड श्रीमंत होते. क्रिस्टल स्कायसारख्या ठिकाणी झालेला हल्ला यशस्वी झाला असता तर त्याचे पडसाद साऱ्या तंत्रज्ञान उद्योग जगतात उठले असते आणि जगभरातल्या वृत्तवाहिन्यांना हेडलाइन मिळाली असती.

''ड्रोनवर लक्ष ठेव,'' हार्वथने आदेश दिला. ''आणि लँगलीमधल्या हेड क्वॉर्टरला फोन लावून त्यांना स्थानिक पोलिसांशी बोलायला सांग. स्थानिक पोलीस जर इथे आले असतील तर आपल्याला त्वरा केली पाहिजे.''

हेनीकडून निरोप आल्यानंतर हार्वथ, मॉरिसन आणि स्टॅलीनकडे वळून ओरडला. ''तुमच्या टीमला त्यांच्या लक्ष्याला पकडायला सांगा.''

क्रिस्टल स्कायच्या स्टेजवर रिक जेम्सचं 'सुपर फ्रीक' हे गाणं वाजत होतं. तो पाठलाग करीत असलेला अंगरखा घातलेला इसम गर्दीच्या रस्त्यावरून पट्कन वळला आणि कॅम्पच्या प्रवेशद्वाराच्या दिशेने निघाला. दोन एकशे यार्ड अंतर कापल्यावर तो कॅम्पमध्ये शिरला असता.

हार्वथकडे आता वेळ नव्हता. त्याला तत्काळ कृती करणं भाग होतं.

◆

## पुस्तकाच्या पानांतून




# रुक्की

**महादेव मोरे**

पृष्ठे : ११२
किंमत : १८०

*‘रुक्की’ तील कथांचा ग्रामीण बाज, वास्तवातील दु:खांवर करतो मात!*

### बळी

कातरवेळही टळली आणि सुशीलाबेन फार अस्वस्थ झाल्या. त्यांची दोन्हीही मुलं अजूनही घरी परतली नव्हती. थोरला सात वर्षांचा राकेश व धाकटा पाच वर्षांचा हर्ष! गेली तरी कुठं ही मुलं? पूर्वी कधी इतका उशीर ती बाहेर राहत नसत, मग आजच...? अनेक शंकाकुशंकांनी त्याचं मन कुरतडू लागलं, मुलांना कुठं शोधावं, हेही त्यांना समजत नव्हतं. तेवढ्यात त्यांचे पती घीसूमल जैन घरी आले.

''ऐकलं का, अजूनही राकेश आणि हर्ष घरी आले नाहीत. मला फार काळजी वाटू लागलीय,'' चिंताग्रस्त चेहऱ्याने सुशीलाबेन म्हणाल्या.

ऐकून घीसूमलही काळजीत पडले. ते म्हणाले,

''तू त्यांना जाऊ तरी कसं दिलंस, अशा अवेळी काळोख पडताना, सांगून तरी गेलीत का मुलं?''

''राकेशच माझ्याजवळ येऊन म्हणाला, की तो व हर्ष रमेश दादाबरोबर चेंडू आणायला जातो म्हणून. लवकरच परत येतील म्हणून मी त्यांना अडवलंही नाही. दोघेही रमेशबरोबर गेलेत. आपण जाऊन जरा चौकशी तरी करू या.''

''बरं, येतो चौकशी करून.'' घीसूमल म्हणाले व बाहेर पडले.

रमेश त्यांच्या सख्ख्या भावाचा, भंवरलालचा मुलगा. भंवरलाल खालच्याच फ्लॅटमध्ये राहिलेला. घीसूमल भावाच्या घरी गेले. तेथे रमेश होताच. त्याला त्यांनी विचारले,

''अरे बाबा रमेश, तू आलास होय. राकेश व हर्ष कुठे आहेत?''

''मला काय माहीत? सकाळपासून दोघंही सारखं म्हणत होते, की संध्याकाळी 'तेरापंथी हॉल'मधील कार्यक्रम बघायला आम्ही जाणार. तिकडेच दोघंही गेले असतील. ते माझ्याबरोबर बाहेर गेले होते, असं आपणाला कुणी सांगितलं काका?''

घीसूमलचा मोठा भाऊ भंवरलालचा रमेश हा मुलगा, तेव्हा त्याच्या बोलण्यावर अविश्वास दाखविण्याचा प्रश्नच नव्हता; पण आपल्या बायकोनं तर सांगितलं आहे की, दोन्ही पोरं रमेशबरोबर बाहेर गेलीत म्हणून. त्यामुळे त्यांनी परत रमेशला विचारलं, ''तुझी काकूच सांगतेय, की राकेश तिला सांगूनच गेला आहे, की आपण व हर्ष तुझ्याबरोबर चेंडू आणायला जातो म्हणून.''

''नाही काका, ते माझ्याबरोबर आले नव्हते. चला आपण 'तेरापंथी हॉल'मध्ये तरी पाहून येऊ, तेथे थांबलेही असतील.'' रमेशच्या या उत्तराने घीसूमलनाही वाटले, याच्याबरोबर हर्ष व राकेश गेलेले नाहीत. आपला हा पुतण्या याबाबत खोटं तरी कशाला बोलेल? शेजारचे आणखीन काही लोक व रमेश यांच्यासह ते मुलांना शोधू लागले. 'तेरापंथी हॉल' बंद हाता व तेथे कसलाही कार्यक्रम नव्हता. अवेळी पडलेला पाऊस व जोरदार वादळी वारे यामुळे वातावरणात एक वेगळीच भयानकता भरलेली होती आणि सर्व

परिसरातील वीजही गेली होती. तरीही तशा अंधारात सर्व जण मुलांना शोधतच राहिले; पण ती कुठंच सापडली नाहीत; मुलं अल्पवयीन असल्यामुळे त्या भागाशिवाय शहरातील अन्य भागांची त्यांना माहितीही नव्हती. दोन्ही पोरं गेली तरी कुठं? कुणालाच समजेना. घीसूमलचा मनातून थरकाप उडाला होता. मुलांना कुणी किडनॅपिंग तर केलं नाही ना?

दोन्ही मुलं बेपत्ता झाल्याची बातमी पुन्हा 'शाहीबाग' भागामध्ये वाऱ्यासारखी पसरली. अहमदाबाद शहरातील 'शाहीबाग' हा एक विभाग असून त्यांतील 'ज्युली अपार्टमेन्ट'मध्ये जैन कुटुंब राहत होते. ही घटना घडली तो दिवस होता १९ एप्रिल, १९८८.

मुलांच्या तपासात अपयश आल्यावर घीसूमल घरी परतले. शोक व रडारड यांत सारं घर बुडालेलं होतं. सुशीलाबेनने रडून एकच आकांत मांडला होता. रमेशनेच आपल्या मुलांना नेलंय, ही एकच गोष्ट ती वारंवार बोलून दाखवीत होती. आपल्या पतीबरोबर रमेशही घरी आलेला बघून सुशीलाबेन रागाने म्हणाली,

''माझी पोरं कुठं गेली सांग, तूच तर त्यांना आपल्याबरोबर घेऊन गेला होतास.''

''काकू, ती दोघं माझ्याबरोबर आली नाहीत. आली असती तर आतापर्यंत ती परतली नसती का?''

''तूच त्यांना फूस लावून नेलं आहेस. तुझ्याबरोबरच आम्ही जातो म्हणून खुद्द राकेशनं मला सांगितलं होतं. माझी मुलं खोटं बोलत नाहीत. तू माझ्या मुलांना कुठं सोडून आला आहेस, एवढंच सांग मला.'' रडत रडत सुशीलाबेन विचारत होती.

यावर रमेश एकच सांगत होता. मुलं आपल्याबरोबर आली नव्हती.

घीसूमल जैन अहमदाबादमधील प्रसिद्ध कापड व्यापारी होते. त्यांची दोन्ही पोरं बेपत्ता झाल्याची बातमी समजताच त्यांच्या गोतावळ्यातील सारे 'ज्युली अपार्टमेंट'मध्ये आले. चौकशी, सांत्वन करू लागले. अखेर रात्री-१० वाजता 'शाहीबाग पोलीस स्टेशन'मध्ये जाऊन आपली दोन्ही मुलं संध्याकाळपासून बेपत्ता असल्याची तक्रार त्यांनी नोंदविली.

घीसूमल जैन मूळचे राजस्थानमधील 'बाडमेर' जिल्ह्यातील 'जामे समदडी' गावचे. १९७३साली उदरनिर्वाहासाठी ते अहमदाबादला आले

होते. त्यांच्याच गावचे धनराज जैन अहमदाबादला होते व त्यांनी व्यापारात आपला जम बसविला होता. त्यांच्याच मदतीने घीसूमल आपल्या नशिबाची परीक्षा पाहण्यासाठी धडपडू लागले. नशिबानेही साथ दिल्यामुळे धंदा चांगला चालू लागला. तेरा वर्षांच्या कठोर परिश्रमांनंतर घीसूमल अहमदाबादमधील प्रतिष्ठित व्यापारी म्हणून ओळखले जाऊ लागले. पैसा व प्रतिष्ठा त्यांच्या पायावर लोळण घेऊ लागली. सुरुवातीला त्यांनी धनराज जैन यांच्याबरोबर भागीदारीत व्यापार सुरू केला. मग १९८६मध्ये काहीही मतभेद, भांडण वगैरे न होता. त्यांनी स्वत:चा स्वत: व्यापार करण्याचा निर्णय घेऊन धनराजपासून ते अलग झाले. ते सुरुवातीला 'सुजाता अपार्टमेंट'मध्ये राहत असत. भागीदारी संपविल्यावर मग ते 'ज्युली अपार्टमेंट'मध्ये फ्लॅट घेऊन राहू लागले. खरंतर त्यांनी व्यापारात आपला चांगला जम बसविलेला होता; पण ते तेवढ्याने समाधानी नव्हते. त्यांना आपल्या मोठ्या भावाची, भंवरलालची काळजी लागली होती. तेव्हा भंवरलाल कर्नाटकातील एका शहरात आपलं एक कापडाचे दुकान कसेबसे चालवत होते. त्यांतून त्यांना विशेषशी कमाईही होत नव्हती. त्यामुळे घीसूमलने आपल्या थोरल्या भावालाही अहमदाबादला बोलाविले. त्यांचा धाकटा भाऊ अशोकही पूर्वीपासूनच त्यांच्याबरोबर व्यापारात होताच. अशा प्रकारे तिघेही भाऊ अहमदाबादमध्ये व्यापार करू लागले. घीसूमल जैन आपली पत्नी व दोन मुलांसह 'ज्युली अपार्टमेंट'मधील पहिल्या मजल्यावर राहू लागले. त्यांच्या खालच्याच फ्लॅटमध्ये भंवरलाल जैन आपल्या १८ वर्षांच्या मुलासह-रमेशसह राहत होते. घीसूमलचे वडील झबरचंद आपल्या इतर मुलांसह राजस्थानातील 'समदडी' गावी आपल्या वडिलार्जित घरीच राहत होते.

घीसूमलने आपल्या पोलीस स्टेशनमधील तक्रारीत नोंदविलं, की 'राकेश (वय-७ वर्षे) व हर्ष (वय-५ वर्षे) ही 'अमृत स्कूल'मध्ये इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकणारी आपली दोन्ही मुलं बेपत्ता आहेत. कडक उन्हाळा व दुष्काळ यामुळे सर्व गुजरातमध्ये लवकरच परीक्षा घेतल्या गेल्याने, शाळा बंद झाल्या होत्या अन् म्हणून आपली मुलं घरीच होती. आपलं कुणाशीही वैर नाही. त्यामुळे आपला कुणावर संशयही नाही.'

ही प्राथमिक तक्रार पोलीस इन्स्पेक्टर श्री.बी.जे.गरचर यांनी भारतीय कायद्यातील कलम नं.३६३, ३४३, ३४६, ३९४ खाली नोंदवून घेतली

व तपासास सुरुवात केली. आजूबाजूच्या सर्व पोलीस स्टेशन्सना वायरलेसने सूचना दिल्या व त्वरित तपासाच्या कामास सुरुवात झाली; पण मुलांचा ठावठिकाणा कुठे आहे, याचा थोडाही सुगावा लागेना. मग पोलीस सुपरिटेन्डन्ट श्री.पी.सी गणात्रा यांच्या मार्गदर्शनाखाली इन्स्पेक्टर श्री. गरचर तपास करू लागले.

दोन्ही मुलांचे फोटो अहमदाबाद दूरदर्शन केंद्रावरून दाखविण्यात आले व ही मुलं कुणाला आढळल्यास ‘शाहीबाग पोलीस स्टेशन’ला त्वरित कळविण्याबाबत सूचना दिली गेली. २० एप्रिलला म्युनिसिपल कॉर्पोरेटर श्री. नरेंद्र भट्ट यांनी मुख्यमंत्री श्री. अमरसिंह चौधरी यांना एक पत्र पाठवून विनंती केली, की मुलांचा तपास त्वरेने केला जावा. स्थानिक दैनिकांनी २१ एप्रिलच्या अंकात या प्रकरणाला ठळक प्रसिद्धी दिली व पोलिसांच्या निष्क्रियतेवर टीकाही केली. त्यामुळे राज्य सरकारने हे तपासकार्य ‘राज्य पोलीसदला’वर सोपविलं. पोलीस तपास करू लागले. वारंवार येणाऱ्या टेलिफोनवरून त्यांनी ओळखलं,की हे किडनॅपिंगचं प्रकरण आहे. मुलांचं कुणीतरी अपहरण केलं आहे. पोलीस सब-इन्स्पेक्टर श्री. पठाण, डेप्युटि पोलीस कमिशनर श्री. रबारी या प्रकरणाचा तपास करीत होते. २२ एप्रिलपर्यंत तरी तपासकार्यात यश आलं नाही. त्यामुळे सर्व मारवाडी समाजात असंतोष पसरला. पोलिसांवर टीका होऊ लागली.

२३ एप्रिलला घीसूमल जैन यांना एक टेलिफोन आला. पलीकडून बोलणाऱ्याने फोनवर सांगितले, की आपल्या मुलांना जर जिवंत पाहायचं असेल तर पाच लाख रुपये घेऊन ‘रूपाली’ चित्रपटगृहाजवळ या. बोलणाऱ्याने ‘रूपाली’जवळ कुठं येऊन थांबायचं तेही सांगितलं, अर्थात घीसूमलनी या फोनबाबत पोलिसांच्या कानावर घातलं. साध्या वेषातील पोलीस ‘रूपाली’जवळ संकेतस्थळानजीक जाळं लावून बसले व तेथे घुटमळणाऱ्या एका तरुणाची त्यांनी मानगूट धरली व पोलीस स्टेशनवर आणले. त्या तरुणाचं नाव संदीप संघवी असं होतं आणि तो एम.कॉम.चा विद्यार्थी होता. ‘सुजाता अपार्टमेंट’मध्ये तो राहत होता. पूर्वी घीसूमलही तेथेच राहत होते संदीपचे वडील दिनकर राय संघवी हे अहमदाबादमधील एका चित्रपटगृहात अकाउन्टन्ट होते.

पोलिसांनी आधी धुलाई, मग सफाई हा तरीका वापरल्यावर मग संदीपनं

फोन आपणच केल्याचं कबूल केलं; पण मुलांच्याबाबत आपणास काही माहिती नाही. केवळ चेष्टा करण्यासाठी आपण फोनवर पाच लाख रुपये मागितले, असे त्याने सांगितले. पण, त्याच्या सांगण्यावर पोलिसांचा विश्वास बसला नाही. प्राथमिक चौकशीनंतर पोलिसांनी त्याला कोर्टापुढे हजर केले व १० दिवसांचा रिमांड मागून घेतला. मग त्याची व्यवस्थितपणे चौकशी सुरू झाली; पण त्यांतून काही महत्त्वाचं बाहेर आलं नाही. प्रथम सांगितलेलीच गोष्ट तो पुन्हा पुन्हा सांगू लागला. आता पोलिसांना हे प्रकरण जास्तच रहस्यमय वाटू लागलं. गावाकडील घीसूमल जैनचे वडील व अन्य नातेवाईकही ही बातमी समजताच अहमदाबादला आले. खूप प्रयत्न करूनही मुलांचा काहीच पत्ता अद्याप लागलेला नव्हता. मुलांच्या आजीनं (घीसूमलच्या आईनं) तर अन्नाला स्पर्शही केला नव्हता. तिचं सांत्वन करणाऱ्यांना ती म्हणे, ''पोरं घरी आल्यावर मी जेवेन.''

इकडे पोलिसांना शोधकार्यात अजूनही यश येत नव्हतं. अहमदाबादला दूरदर्शनशिवाय मुंबई दूरदर्शनवरही हरवलेल्या दोन्ही मुलांची बातमी फोटोसह दिली गेली. गुन्हा अन्वेषण विभागातील (क्राइम ब्रँचमधील) अहमदाबादचे पोलीस सुपरिंटेंडेंट श्री.के.के.पटेल व त्यांचा सारा स्टाफ बेपत्ता झालेल्या मुलांचा शोध घेऊ लागला; पण मुलांचं हरवणं हे एक रहस्यच बनत राहिलं.

२४ एप्रिल, १९८८ रोजी 'कोटेश्वर' गावातील लोकांनी पोलिसांना बातमी दिली की, गांधीनगरमार्गावर 'हांसोल'जवळ झालेल्या इंदिरा ब्रिजजवळ नदीच्या पात्रात एक डब्बा पडला असून, त्यातून लहान मुलाचे पाय बाहेर आलेले आहेत. ही बातमी मिळताच पोलीस सबइन्स्पेक्टर राजू याज्ञिक घटनास्थळावर पोहोचले. घीसूमल जैननाही ही बातमी कळविल्यामुळे तेही तेथे आले होते. 'जसवंत छाप बिडी' या डब्यातून छोटे छोटे दोन पाय बाहेर आलेले दिसत होते. डब्बा खोलला तर त्यांत ४-५ वर्षांच्या एका मुलाचं प्रेत आढळलं. प्रेत पाहताच घीसूमल जैन छाती बडवून घेत आक्रोश करू लागले. त्यांच्या लहान मुलाचं, हर्षचं ते प्रेत होतं.

◆

## १६ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर, २०२६ दरम्यानचे दिनविशेष

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर **५० टक्क्यांपर्यंत सूट**

**खालील संचांवर १६ ते ३१ ऑगस्ट दरम्यान खास सवलत**

**१८ ऑगस्ट - गुलज़ार यांचा जन्मदिन**

'त्रिवेणी', 'रावीपार', 'धागे' या पुस्तकांवर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ४२५/- । सवलत किंमत २९८/-**

**१९ ऑगस्ट - सुधा मूर्ती यांचा जन्मदिन**

'आजीच्या पोतडीतल्या गोष्टी', 'अस्तित्व', 'आयुष्याचे धडे गिरवताना', 'बकुळा', 'डॉलर बहू', 'गरुडजन्माची कथा', 'गोष्टी माणसांच्या', 'हरवलेल्या मंदिराचे रहस्य', 'कल्पवृक्षाची कन्या', 'महाश्वेता', 'परीघ', 'पितृऋण', 'सुकेशिनी आणि इतर कथा', 'थैलीभर गोष्टी', 'वाइज अँड अदरवाइज', 'स्वर्गाच्या वाटेवर काहीतरी घडलं...', 'पुण्यभूमी भारत', 'सामान्यांतले असामान्य', 'सर्पाचा सूड', 'आजी-आजोबांच्या पोतडीतल्या गोष्टी', 'तीन हजार टाके', 'त्रिशंकू', 'दोन शिंगे असलेला ऋषी', 'हरवलेल्या गोष्टीचे रहस्य', 'गोपीची डायरी', 'आजोबांच्या पोतडीतल्या गोष्टी', 'सुधा मूर्तींच्या बालकथा', 'गोपीची डायरी : एक उनाड दिवस', 'द सर्कल ऑफ लाइफ', 'हरवलेल्या कर्णफुलांचे रहस्य' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ७०१५/- । सवलत किंमत ५३२९/-**

**१९ ऑगस्ट - जॅक कॅनफिल्ड यांचा जन्मदिन**

'चिकन सूप' मालिकेतील ६१ पुस्तकांवर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १३२५०/- । सवलत किंमत ९८७९/-**

**१९ ऑगस्ट - फ्रॅन्क मॅककोर्ट यांचा जन्मदिन**

'अँजेलाज ॲशेस' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३८०/- । सवलत किंमत २८९/-**

**२० ऑगस्ट - नारायण मूर्ती यांचा जन्मदिन**

'नारायण मूर्ती : मूल्यं जपणारं एक अद्वितीय आयुष्य', 'अ बेटर इंडिया अ बेटर वर्ल्ड' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ५१५/- । सवलत किंमत ३६१/-**

**२० ऑगस्ट - एस. एल. भैरप्पा यांचा जन्मदिन**

‘पर्व’, ‘वंशवृक्ष’, ‘काठ’, ‘आवरण’, ‘मंद्र’, ‘पारखा’, ‘तडा’, ‘तंतू’, ‘परिशोध’, ‘सार्थ’, ‘उत्तरकांड’, ‘साक्षी’, ‘गृहभंग’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ६१५०/- । सवलत किंमत ४६११/-**

**२१ ऑगस्ट - ब्रॅड थॉर यांचा जन्मदिन**

‘ब्लॅक लिस्ट’, ‘फुल ब्लॅक’, ‘यूज ऑफ फोर्स’, ‘स्पाय मास्टर’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २४००/- । सवलत किंमत १६८०/-**

**२३ ऑगस्ट - नेल्सन डेमिल यांचा जन्मदिन**

‘द लायन्स गेम’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ६९५/- । सवलत किंमत ४९९/-**

**२४ ऑगस्ट - अलेक्झांडर मॅक्काल स्मिथ यांचा जन्मदिन**

‘मोरॅलिटी फॉर ब्यूटिफुल गर्ल्स’, ‘टिअर्स ऑफ द जिराफ’, ‘द नंबर वन लेडिज डिटेक्टिव्ह एजन्सी’, ‘द फुल कबर्ड ऑफ लाइफ’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ८९०/- । सवलत किंमत ६४९/-**

**२५ ऑगस्ट - तसलिमा नासरिन यांचा जन्मदिन**

‘लज्जा’, ‘फेरा’, ‘निर्बाचित कलाम’, ‘नष्ट मेयेर नष्ट गद्य’, ‘निर्बाचित कबिता’, ‘आमार मेयेबेला’, ‘उधाण वारा’, ‘फरासि प्रेमिक’, ‘द्विखंडित’, ‘शोकोलग्रिह हारालोजार’, ‘भाबनागुलो’, ‘बेशरम’, ‘चुंबन’, ‘अंधारातील दिवस’  या पुस्तकसंचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ४८०४/- । सवलत किंमत ३५१८/-**

**२५ ऑगस्ट - फ्रेडरिक फोरसाइथ यांचा जन्मदिन**

‘नो कम बॅक्स’, ‘द अफगाण’, ‘द फिस्ट ऑफ गॉड’, ‘मध्यस्थ’, ‘द ओडेसा फाइल’, ‘द किल लिस्ट’, ‘द डे ऑफ द जॅकल’, ‘आयकॉन’, ‘द फोर्थ प्रोटोकॉल’  या पुस्तकसंचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ४७८५/- । सवलत किंमत ३२०६/-**

**२५ ऑगस्ट - पुरुषोत्तम अग्रवाल यांचा जन्मदिन**
'नाकोहस' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १९५/- । सवलत किंमत १३९/-**

**२९ ऑगस्ट - धिरेंद्र मेहता यांचा जन्मदिन**
'छावणी' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १४९/-**

**२९ ऑगस्ट - इनग्रिड बर्गमन यांचा जन्मदिन**
'माय स्टोरी' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ४९५/- । सवलत किंमत ३३९/-**

**३१ ऑगस्ट - शिवाजी सावंत यांचा जन्मदिन**
**संच १ -** 'मृत्युंजय', 'छावा', 'छावा' (इंग्रजी), 'युगंधर', 'मृत्युंजय'(नाटक), 'छावा'(नाटक), 'मोरावळा', 'कांचनकण', 'शेलका साज', 'अशी मने असे नमुने', 'कवडसे', 'युगंधर श्रीकृष्ण : एक चिंतन' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ४०८३/- । सवलत किंमत २९५२/-**

**संच २ -** 'मृत्युंजय', 'छावा', 'युगंधर' (हार्ड बाउन्ड)
**संचाची मूळ किंमत २१९५/- । सवलत किंमत १५८७/-**

**खालील संचांवर १ ते १५ सप्टेंबर दरम्यान खास सवलत**

**१ सप्टेंबर - कुंदन तांबे यांचा जन्मदिन**
'नाना आणि महादजी' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १३९/-**

**२ सप्टेंबर - नसीमा हुरजूक यांचा जन्मदिन**
'चाकाची खुर्ची' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २५१/-**

**२ सप्टेंबर - शुभदा गोगटे यांचा जन्मदिन**
'अस्मानी', 'चला जाणून घेऊ या! फेंग शुई', 'चला जाणून घेऊ या! सुख', 'घर', 'हृदयविकार निवारण', 'निरामय यशासाठी ध्यान', 'सांधा

बदलताना', 'वसुदेवे नेला कृष्ण' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १८०५/- । सवलत किंमत ११०८/-**

**२ सप्टेंबर - व्हिक्टर फ्रॅन्कल यांचा जन्मदिन**
'अर्थाच्या शोधात' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १८०/-**

**३ सप्टेंबर - जी. बी. देशमुख यांचा जन्मदिन**
'कुलामामाच्या देशात', 'अ-अमिताभचा', 'महारुद्र', 'छाटितो गप्पा', 'अमरावतीचे छप्पन स्वभाव' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १२००/- । सवलत किंमत ९००/-**

**५ सप्टेंबर - जागतिक शिक्षक दिन**
'टू सर, विथ लव्ह', 'चिकन सूप फॉर द सोल इंडियन टीचर्स', 'स्टोन्स इन्टू स्कूल्स', 'थ्री कप्स ऑफ टी', 'मी मलाला' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १७१०/- । सवलत किंमत १०२६/-**

**६ सप्टेंबर - नितीन बापट यांचा जन्मदिन**
'आंधळा न्याय' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १९५/- । सवलत किंमत १३९/-**

**८ सप्टेंबर - लीना सोहोनी यांचा जन्मदिन**
'अनुवादातून अनुसर्जनाकडे' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३७०/- । सवलत किंमत २७९/-**

**१० सप्टेंबर - डॉ. एम. बी. कुलकर्णी यांचा जन्मदिन**
'शब्दचर्चा' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ४००/- । सवलत किंमत २७९/-**

**१० सप्टेंबर - नील डोनाल्ड वॉल्श यांचा जन्मदिन**
'संवाद परमेश्वराशी - भाग २', 'संवाद परमेश्वराशी - भाग ३' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ७१५/- । सवलत किंमत ५२९/-**

**१० सप्टेंबर - विजया जहागिरदार यांचा जन्मदिन**

'कर्मयोगिनी (इंग्लिश)' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २७९/-**

'कर्मयोगिनी (मराठी)' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ६२०/- । सवलत किंमत ४९६/-**

**१० सप्टेंबर - सुनील दांडेकर यांचा जन्मदिन**

'आगमन' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २६०/- । सवलत किंमत १८९/-**

**१० सप्टेंबर - प्रा. पुरुषोत्तम रामदासी यांचा जन्मदिन**

'डेस्टिनेशन', 'बाईची गोष्ट', 'एपिटाफ' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ७३०/- । सवलत किंमत ५४८/-**

**१२ सप्टेंबर - बिभूतिभूषण बॅनर्जी यांचा जन्मदिन**

'पथेर पांचाली' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २७९/-**

**१३ सप्टेंबर - रॉय मॉक्झॅम यांचा जन्मदिन**

'असा लुटला भारत' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २६३/-**

**१५ सप्टेंबर - दया पवार यांचा जन्मदिन**

'विटाळ', 'चावडी', 'जागल्या', 'पासंग', 'कोंडवाडा', 'पाणी कुठंवर आलं गं बाई...' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ८९५/- । सवलत किंमत ६३५/-**

**१५ सप्टेंबर - स्टीफन ऑल्टर यांचा जन्मदिन**

'हिमालयारण्यक' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ६५०/- । सवलत किंमत ४८८/-**

◆

# वि. स. खांडेकर : सुवर्ण स्मृतिवर्ष



RNI. No. MAHMAR/2000/02739
Posting at BPC - Round Garden, Vijayanagar Colony, Sadashiv Peth, Pune - 411030.
Publication Date : 11/08/2026 Posting Date : 11/08/2026

## व्यंकटेश माडगूळकर : जन्मशताब्दी वर्ष




**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन - (०२०) २४४७६९२४

प्रति, ______________________________